cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८८ | रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### टोलची विक्रमी वसुली, सेवांची मात्र कोंडी

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अलीकडील भीषण कोंडीने केवळ वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या नाहीत, तर टोल वसुलीच्या संपूर्ण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. देशातील सर्वाधिक वर्दळीचा आणि आधुनिकतेचे प्रतीक मानला जाणारा मुंबई–पुणे द्रुतगती महामार्ग काही तासांसाठी अक्षरशः ठप्प झाला आणि हजारो प्रवासी उन्हात, उपासमार आणि अस्वस्थतेत अडकून पडले.

## थोडक्यात...

### झिरवाळांच्या मागे विरोधकांचा सापळा

मुंबई : अर्थसंकल्पीय अधिवेशन काही दिवसांवर असतानाच नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातच लाचखोरीचे प्रकरण घडल्याने भाजपा महायुती सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. या लाचखोरीची निष्पक्ष चौकशी होण्यासाठी मंत्री नरहरी झिरवाळांनी तात्काळ मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेस, शिवसेनेने केली आहे. दरम्यान, या लाचखोरीची पाळेमुळे जर माझ्यापर्यंत आली तर निश्चितच मी राजीनामा देईल असे झिरवाळ यांनी म्हटले होते. मात्र, शनिवारी १४ फेब्रुवारी सकाळपासून मंत्री नरहरी झिरवाळ हे नॉट रिचेबल होते. दुसरीकडे नरहरी झिरवाळ यांच्या विभागातील लाचखोर लिपिक राजू संपत ढेरिंगे याला विशेष सत्र न्यायालयाने १६ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

### राज ठाकरेंच्या भाषणांची न्यायालय करणार चौकशी

मुंबई: मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. अमराठी भाषिकांविरोधात राज ठाकरे तसेच त्यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांनी कथितपणे केलेल्या द्वेषपूर्ण वक्तव्यांची तपासणी होणार असून न्यायालयाने कथित वक्तव्यांचा तपशील मागविला आहे. उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी एक याचिका दाखल केली आहे. त्यांनी आपल्या अर्जात राज ठाकरे आणि संबंधित कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा नोंदवण्याची मागणी केली आहे. शुक्ला यांनी दावा केला आहे की, त्यांच्या कार्यालयावर मनसेशी संबंधित सुमारे ३० व्यक्तींनी तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. तसेच समाजमाध्यमांवर पोस्ट करून त्यांना धमकावण्यात आले.

### सहा पदरी पुलाचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

गुवाहाटी: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (१४ फेब्रुवारी) आसाममधील ब्रह्मपुत्रा नदीवरील सहा पदरी पुलाचे उद्घाटन केले. ३,०३० कोटी रुपयांचा कुमार भास्कर वर्मा सेतू गुवाहाटीला उत्तर गुवाहाटीशी जोडेल. ईशान्येतील हा पहिला काढलेला प्रीस्ट्रेस्ड काँक्रीट पूल आहे. उद्घाटनानंतर पंतप्रधान मोदींनी पुलावर फेरफटका मारला. यावेळी आसामचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य आणि मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा उपस्थित होते. पंतप्रधान मोदी यांनी आयआयएम गुवाहाटीचे अनावरण केले आणि संपूर्ण ईशान्येकडील उच्च तंत्रज्ञान डेटा केंद्राचे उद्घाटन केले.

### अल्पवयीन मुलासह मतदान आयोगाचे कारवाईचे आदेश

सोलापूर: जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी (शप) पक्षाचे उमेदवार अर्जुनसिंह मोहिते पाटील यांचा मुलगा मतदान केंद्रात त्याच्या शेजारी उभा राहून ईव्हीएम बटण दाबताना दिसत होता. यावरून, एका अल्पवयीन मुलाला मतदान केंद्रावर प्रवेश दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने सोलापूरमधील एका मतदान अधिकारी आणि एका पोलिस हवालदाराला निलंबित करण्याचे आदेश दिले आहेत. मतदान केंद्रावर तैनात असलेले मतदान अधिकारी अण्णा सावता बुधे आणि पोलिस हवालदार गजानन सीताराम राजूत यांनी निवडणूक कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याचे निवडणूक आयोगाला आढळून आले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१३ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३२.०० क्विंटल | २,१५१ | ३,४५० | २,४७७ |
| ज्वारी/हायब्रिड :२७.०० क्विंटल | २,३०० | ४,३५१ | ३,५०५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ९.०० क्विंटल | ७,२०१ | ७,८५० | ७,६७४ |
| उडीद : ७.०० क्विंटल | ४,८०० | ५,७०० | ५,२५० |
| बाजरी: ११.५० क्विंटल | २,०५० | ३,११६ | २,७३७ |
| मुग: २.०० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| सोयाबीन: ५४.०० क्विंटल | ५,३७० | ५,३८० | ५,३७३ |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,५०० | ५,२०० | ४,७६६ |

# उत्तम रोजगार निर्मितीसाठी कृषी जोड व्यवसाय आवश्यक !

## शेती विकास उत्पादकता वाढवण्यासाठी ५०० कोटींचे मिशन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

प्रकाश वर्मा । परळी

**रासायनिक खतामुळे शेती व्यवसाय उत्पादकता कमी होत आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी पुन्हा जीवामृत नैसर्गिक शेतीचा उपयोग सर्व शेतकऱ्यांनी करणे काळाची गरज बनलेली आहे, यातूनच विषमुक्त अन्न उपलब्ध होईल तर शेतकऱ्यांना परवडेल अशी शेती देखील निर्माण होईल. उत्तम रोजगार निर्मिती करायची असेल तर शेतीचे पुर्वीप्रमाणे जोड व्यवसाय आवश्यक आहेत त्याचबरोबर राज्यामध्ये शेती विकास उत्पादकता वाढवण्यासाठी ५०० कोटीचे मिशन हाती घेतलेले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.**

पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने परळी येथे सुरू असलेल्या महा पशुधन एक्स्पो २०२६ अंतर्गत आयोजित प्रदर्शनाला १४ फेब्रुवारी रोजी राज्याचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट देऊन पशुपालकांशी संवाद साधला. यावेळी व्यासपीठावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपली संस्कृती निसर्ग संतुलित करणारी आहे ज्या ठिकाणी पशुधन आहे त्याच ठिकाणी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात आधार मिळतो. पशुधनाच्या जोड व्यवसायातून शेती समृद्ध झालेली आहे. अलीकडच्या काळामध्ये शेतकरी कापूस सोयाबीनकडे वळला आहे, त्यामुळे शेती विविध कारणावरून लहान होऊ लागली आहे. त्याचबरोबर शेतामधील वैरण देखील कमी झाली असल्यामुळे परिणामी पशुधन सांभाळणे देखील जोखमीचे होऊ लागले आहे, याचा मोठा परिणाम देखील शेती आणि शेतकऱ्यांवर झाल्याचा आपण पाहत आहोत. आता यांत्रिकीकरणामुळे पशुधनाचे महत्त्व कमी झाले आहे, परंतु पुन्हा एकदा पशुधनाची

▶▶ पान २ वर

### वैरण विकास उपक्रम राबवला जाणार

शेती पुन्हा फायदेशीर करण्यासाठी आणि पशुधन सुरक्षित करण्यासाठी वैरण विकास उपक्रम हाती घेतला जाणार आहे. यातून शेतकऱ्यांना त्यांच्याच शेतामध्ये हिरवा चारा तयार करण्यासाठी प्रवृत्त केले जाणार आहे. शेतकऱ्यांना पशुधन सांभाळण्यासाठी हे उपयुक्त आहे. गाई म्हशी पशुधन वाढवायचे असेल तर वैरण विकास गरजेचा आहे असेही आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले..

### जोड व्यवसाय हाच यशाचा मूलमंत्र

आत्ताची शेती फायद्याची उत्पन्नाची आणि उत्तम रोजगार निर्मितीची करायची असेल तर जोड व्यवसाय ही काळाची गरज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा कुक्कुटपालन, शेळीपालन, मेंढी पालन मत्स्य उद्योग व्यवसाय त्याचबरोबर शेतीचे जोड व्यवसाय करणे हेच येणाऱ्या काळामध्ये शेतकऱ्यांना आणि गाव विकासासाठी फायद्याचे ठरणारे आहेत असेही आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

### महिलांसाठी शेती जोड व्यवसाय योजना तयार करा

पशु संवर्धन तथा पर्यावरण विभागांतर्गत संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये महिलांसाठी कुक्कुटपालन योजना शेळी मेंढी पालन योजना यासह अन्य शेतीसाठी जोड व्यवसाय योजना निर्माण कराव्यात. पशु संवर्धन तथा पर्यावरण विभागांतर्गत आपण ज्या ज्या महिलांसाठी जोड व्यवसायाच्या योजना राबवतात त्या त्या सर्व योजनांसाठी मुख्यमंत्री म्हणून बजेट मिळून दिले जाईल, असे आश्वासन देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

### पशु वैद्यकीय चिकित्सालांचे बळकटीकरण होणार

शेती समृद्ध करण्यासाठी पशुधन आवश्यक आहे आणि पशुधन सांभाळण्यासाठी पशुवैद्यकीय चिकित्सालय अत्याधुनिक असणे आवश्यक आहे राज्यभरातील पशुवैद्यकीय चिकित्सालयांचे बळकटीकरण केले जाईल. पशु चिकित्सकांची संख्या वाढवली जाईल पशूंची आरोग्य चांगले राहण्यासाठी येणाऱ्या काळामध्ये कामे केले जातील असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई, पार्थ व जय पवारांचा नरेश अरोरा कंपनीला यु टर्न

पुणे । प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित दादा पवार यांचे राजकीय सल्लागार असलेले नरेश अरोरा व त्यांच्या कंपनीबाबत तात्कालीन उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या रणनीती संदर्भात आणि पुढील कामा संदर्भात यु टर्न घेतला असल्याची चर्चा होताना दिसत आहे.**

अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादीपुढे उभ्या राहिलेल्या विविध आव्हानांच्या पार्श्वभूमी आणि राजकीय हालचाली संदर्भात पुण्यातील जिजाई बंगल्यावर एक तास चर्चा झाली. त्यानंतर



शासकीय विश्रामगृहावर चर्चा झाली यावेळी पार्थ व जय पवार देखील उपस्थित होते. यासंबंधीच्या माहितीनुसार, अजित पवारांचे कुटुंबीय व नरेश अरोरा यांच्यात जवळपास तासभर चर्चा झाली. पार्थ पवार, जय पवार व नरेश अरोरा यांच्यात प्रथम पुण्यातील जिजाई बंगल्यावर एक तास चर्चा झाली.

▶▶ पान २ वर

# माजी मंत्र्यांच्या कॉलेजवरील जागेवर बँकेचा कब्जा

## आठ कोटीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांना नोटीस

बीड । प्रतिनिधी

**माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्था असून, अनेक महाविद्यालयात पाटोदा येथील महाविद्यालयाच्या जागेवर आठ कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले होते. त्याचा भरणा न केल्यामुळे पाटोदा येथील महाविद्यालयाच्या जागेवर द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने ताबा घेतला असून तशी**



**नोटीस आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह माजी प्राचार्य दत्तात्रय आघाव आणि प्राध्यापक नंदकुमार पटाईत यांना पाठवण्यात आली आहे.**

नवगण आदर्श यासह अन्य शिक्षण संस्था या माजी खासदार स्व.केसर काकू क्षीरसागर यांनी उभारल्या होत्या त्यांचा वारसा त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे चालवत आहेत. प्रामुख्याने त्यांच्याच शिक्षण संस्थेचे पाटोदा येथे पद्मभूषण वसंत दादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय असून, या ठिकाणी टोलेजंग इमारत देखील आहे. याच महाविद्यालयाच्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड येथील द्वारकादास नागरी सहकारी बँकेच्या

▶▶ पान २ वर

# शरद पवारांना रुग्णालयातून डिस्चार्ज

पुणे । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांना शनिवारी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. शरद पवारांच्या प्रकृतीत उत्तम सुधारणा झाल्याने त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. खोकल्याचा आणि कफचा त्रास जाणवू लागल्यामुळे शरद पवार यांना उपचारांसाठी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आले होते. गेले पाच ते सहा दिवस शरद पवारांवर उपचार करण्यात आले, त्यांची प्रकृती चांगली झाल्याने त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे.**

रुबी हॉल क्लिनिकचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. पुरवेझ ग्रँट यांनी याबाबतची माहिती दिली आहे. शरद पवारांना शनिवारी डिस्चार्ज देण्यात आला आहे. शरद पवारांना पुरेशी विश्रांती घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. शरद पवार यांची प्रकृती चांगली आहे आणि ते बरे झाले असल्याचे डॉक्टरांकडून

▶▶ पान २ वर

# पुण्यासह जालना, गडचिरोली, कोल्हापूर जिल्ह्यांत हृदयविकार उपचार केंद्र

## १०० कोटींचा निधी मंजूर; नागरिकांना होणार मोठा फायदा



पुणे । प्रतिनिधी

राज्यात पुण्यासह जालना, गडचिरोली व कोल्हापूर या चार जिल्ह्यांमध्ये हृदय तपासणी व उपचार कक्ष (कार्डियाक कॅथलॅब) उभारणीस सार्वजनिक आरोग्य विभागाने मंजुरी दिली आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला आहे. पुण्यात ही ‘कॅथलॅब’ औंध जिल्हा रुग्णालयात कार्यान्वित होईल. हा प्रकल्प हृदयविकार असलेल्या रुग्णांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

प्रकल्पात अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी हे उपचार मोफत होतील. त्याचबरोबर हृदयाची झडप (व्हॉल्व) व हृदयाचे ठोके नियमित राखण्यासाठी हृदयात बसवले जाणारे ‘पेसमेकर’ हे उपकरण बसवता येईल. या प्रकल्पाची अंमलबजावणी ‘ईपीसी’ पद्धतीने करण्यात येणार असून, यामध्ये कॅथलॅब उभारणीसाठी आवश्यक असलेली संरचनात्मक रचना, यांत्रिकी, विद्युत, प्लंबिंग आराखडे, अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची खरेदी, उभारणी, चाचणी, साठवण, वितरण तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन या सर्व बाबींचा समावेश राहील.

▶▶ पान २ वर




# टिपू सुलतान-शिवाजी महाराज तुलना केल्याने फडणवीस सपकाळ यांच्यावर संतापले

नवी दिल्ली । वृतसंस्था

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समकक्ष बघितले पाहिजे, असे वक्तव्य केले आहे. या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर सडकून टीका केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची छत्रपती शिवाजी महाराजांशी तुलना करण्याचे काम जे केले आहे ते अतिशय निंदनीय आहे.

▶▶ पान २ वर

# शासन सेवेत ओबीसी, एससी-एसटीचा डंका




नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आयएएस, आयपीएस आणि आयएफएस या देशातील सर्वाधिक प्रतिष्ठित सेवांमध्ये नोकरभरती केली जाते. याद्वारे गेल्या पाच वर्षांत (२०२० ते २०२४) आरक्षित वर्गातील किती उमेदवारांची नियुक्ती झाली याबाबतची माहिती समोर आली आहे. सरकारने संसदेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, ओबीसी, एससी आणि एसटी वर्गातील सर्वाधिक उमेदवारांची नियुक्ती भारतीय पोलिस सेवामध्ये झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यसभेत कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि पेन्शन मंत्री (स्वतंत्र प्रभार) डॉ. जितेंद्र सिंह यांनी लेखी उत्तराद्वारे दिलेल्या माहितीनुसार, यूपीएससी नागरी सेवा परीक्षा २०२० ते २०२४ या कालावधीत थेट भरतीद्वारे नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या आकडेवारीनुसार, आयएएस आणि आयएफएसच्या तुलनेत आयपीएसमध्ये आरक्षित वर्गातील उमेदवारांची संख्या अधिक आहे. दरम्यान, यूपीएससीमार्फत जाहीर होणाऱ्या रिक्त पदांच्या संख्येत सातत्याने घट होत असल्याचेही समोर आले आहे. २०२४ : १,०५६ पदे, २०२५ : ९७९ पदे, २०२६ : फक्त ९३३ पदे. म्हणजे गेल्या तीन वर्षांत

▶▶ पान २ वर

### रिक्त पदांची स्थिती पुढीलप्रमाणे

आयएएस मंजूर पदे : ६,८७७ रिक्त पदे : १,३००. आयपीएस मंजूर पदे : ५,०९९ रिक्त पदे : ५०५. आयएफएसमंजूर पदे : ३,१९३रिक्त पदे : १,०२९ सर्वाधिक रिक्त पदे भारतीय वन सेवामध्ये असून त्यानंतर आयएएस आणि आयपीएसचा क्रम लागतो. केंद्रीय आयोग मार्फत आयएएस (भारतीय प्रशासकीय सेवा),आयपीएस (भारतीय पोलिस सेवा), आयएफएस (भारतीय वन सेवा) या परीक्षा घेतल्या जातात या सर्व सेवेत ओबीसी एस्सी एसटी प्रवगाच्या अधिकाऱ्याची संख्या सर्वाधिक आहे.

# पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

## १६५ कोटी खर्च होणार, ४५ लाख विद्यार्थ्यांना लाभ




मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर देण्याचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या योजनेसाठी तब्बल १६५ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, राज्यभरातील सुमारे ४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

▶▶ पान २ वर

### खरेदीसाठी ई–निविदा प्रक्रिया

या दप्तरांच्या खरेदीसाठी ई–निविदा प्रक्रिया राबवण्याचे आदेश देण्यात आले असून, खरेदी प्रक्रियेत उद्योग विभागाच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वितरित निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाला सादर करणे बंधनकारक राहणार आहे.

cmyk

अग्रलेख

# टोलची विक्रमी वसुली, सेवांची मात्र कोंडी

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अलीकडील भीषण कोंडीने केवळ वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी उघड केल्या नाहीत, तर टोल वसुलीच्या संपूर्ण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. देशातील सर्वाधिक वर्दळीचा आणि आधुनिकतेचे प्रतीक मानला जाणारा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग काही तासांसाठी अक्षरशः ठप्प झाला आणि हजारो प्रवासी उन्हात, उपासमार आणि अस्वस्थतेत अडकून पडले. या घटनेनंतर संताप उसळणे साहजिक होते. पण संतापाच्या पलीकडे जाऊन या व्यवस्थेचे मूल्यमापन करणे अधिक आवश्यक आहे. रस्ते आणि वाहतूक मंत्रालयाने संसदेत सादर केलेली टोल वसुलीची आकडेवारी धक्कादायक आणि विचारप्रवर्तक आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात देशभरातून ६१,४०८ कोटी रुपयांचा टोल वसूल झाला. त्याहीपेक्षा आश्चर्यकारक बाब म्हणजे २०२५-२६ च्या केवळ पहिल्या तिमाहीतच ५०,३४५ कोटी रुपये जमा झाले. महसुलाच्या दृष्टीने ही विक्रमी वाढ असली, तरी या रकमेच्या तुलनेत प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधा आणि सुरक्षिततेची पातळी तितकीच उंचावली आहे का, हा मूलभूत प्रश्न अनुत्तरित राहतो.

टोल वसुली ही केवळ महसूल संकलनाची प्रक्रिया नसून ती सार्वजनिक खासगी भागीदारीवर आधारित एक करारबद्ध व्यवस्था आहे. या करारांनुसार संबंधित कंपन्यांनी रस्त्यांची नियमित देखभाल, अपघातग्रस्तांना तत्काळ मदत, रुग्णवाहिका सेवा, सीसीटीव्ही निरीक्षण, प्रकाशयोजना, तसेच मोठ्या कोंडीत अडकलेल्या प्रवाशांसाठी पिण्याचे पाणी, अल्पोपाहार आणि फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. परंतु प्रत्यक्षात या सुविधा वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात दिल्या जातात का, याबाबत गंभीर शंका निर्माण होतात.ङ्गकोंडीच्या वेळी जे दृश्य दिसले, ते केवळ वाहतूक कोंडी नव्हते; ती प्रशासनिक कोंडी होती. आपत्कालीन नियोजनाचा अभाव, समन्वयाची कमतरता आणि प्रवाशांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष या गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. जर टोल हा सेवा शुल्क असेल, तर त्या सेवेचा दर्जा तपासण्याचा अधिकार नागरिकांना आहे. सेवा नसेल, तर शुल्काच्या नैतिकतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. राज्यांच्या टोल वसुलीच्या यादीत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. म्हणजेच महसूलाच्या बाबतीत राज्य आघाडीवर आहे. पण सुविधा, पारदर्शकता आणि जबाबदारीच्या बाबतीतही तेवढीच आघाडी आहे का? हा प्रश्न विचारल्याशिवाय राहवत नाही. वाहनचालकांसाठी मात्र नियम कडक आहेत. टोल थकबाकी असल्यास वाहन विक्री, नोंदणी हस्तांतरण किंवा फिटनेस प्रमाणपत्र प्रक्रियेत अडथळे येऊ शकतात. म्हणजेच नागरिकांवर कठोर अंमलबजावणी होते. पण करारभंग करणाऱ्या कंपन्यांवर तत्सम कठोर कारवाई कितपत होते, याबाबत स्पष्टता नाही. टोल वसुलीचा मुद्दा निवडणुकांच्या काळात हमखास चर्चेत येतो. सर्व पक्ष 'टोलमुक्ती'चे आश्वासन देतात. आंदोलने होतात, टोलनाक्यांवर घोषणाबाजी होते, काही वेळा तोडफोडही घडते. समाजमाध्यमांवर व्हिडिओ व्हायरल होतात. मात्र निवडणुका संपल्या की हा मुद्दा मागे पडतो. टोल व्यवस्थेतील रचनात्मक सुधारणा, करारांची सार्वजनिक माहिती, सेवा मानकांचे प्रकटीकरण, स्वतंत्र देखरेख यंत्रणाया मूलभूत सुधारणा मात्र दुर्लक्षित राहतात. खरे तर टोल हा विकासासाठी आवश्यक निधी उभारण्याचा एक पर्याय आहे. उत्तम रस्ते, सुरक्षित प्रवास आणि जलद वाहतूक व्यवस्था यासाठी आर्थिक स्रोत हवा. परंतु या निधीचा पारदर्शक वापर, करारांची काटेकोर अंमलबजावणी आणि जनतेसमोर उत्तरदायित्व ही तितकीच अपरिहार्य अट आहे. अन्यथा टोल वसुली ही लोकांच्या दृष्टीने 'झोल' ठरते. आज गरज आहे ती भावनिक घोषणांची नव्हे, तर संस्थात्मक सुधारणांची. प्रत्येक टोल करार सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करणे, सुविधा पुरवठ्याचे मोजमापीय निकष जाहीर करणे, तक्रार निवारणासाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करणे आणि करारभंगावर त्वरित दंडात्मक कारवाई करणेया उपाययोजना शक्य आहेत. सरकारने महसूल वाढीबरोबरच उत्तरदायित्वाची पातळीही वाढवली पाहिजे. विरोधी पक्षांनी केवळ आंदोलन न करता या सुधारणांसाठी सातत्याने दबाव आणला पाहिजे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील कोंडी हा एक प्रसंग आहे; पण तो व्यापक व्यवस्थेचे प्रतीक आहे. टोल हा विकासाचा मार्ग ठरू शकतो, परंतु तो लोकांच्या विश्वासावर उभा असतो. तो विश्वास तुटला, तर महसूल कितीही वाढला तरी व्यवस्थेची वैधता डळमळीत होते. राजकीय सोयीसाठी मुद्दे उचलणे सोपे असते; पण त्यांचे कायमस्वरूपी निराकरण करणे कठीण असते. प्रश्न असा आहे की, टोल व्यवस्थेतील दोष खरोखर दूर करण्याची राजकीय इच्छाशक्ती आहे का? की हा मुद्दा केवळ आंदोलनासाठी जिवंत ठेवण्याचीच सर्वांना सोय आहे? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे मिळाली, तरच टोल वसुलीवरील वाद निवळतील. अन्यथा कोंडी, संताप आणि घोषणाबाजीहे चक्र असेच फिरत राहील, आणि त्याची किंमत पुन्हा पुन्हा सामान्य वाहनचालकालाच मोजावी लागेल.

# तळवट बोरगाव शाळेतील विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने जिंकली प्रेक्षकांची मने

गेवराई । प्रतिनिधी

**तालुक्यातील पाचेगाव केंद्रांतर्गत असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव शाळेमध्ये जल्लोष २०२६ या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये डिजिटल एलईडी स्क्रीन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून एलईडी स्क्रीनवर सादर होणारे व्हिडिओ ग्राफिक्स, विद्यार्थ्यांची आकर्षक वेशभूषा, डॉल्बी डिजिटल साऊंड यांच्या समन्वयातून शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या बहारदार कलाविष्काराने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. निमित्त होते शाळेतील विद्यार्थ्यांचा जल्लोष २०२६ वार्षिक स्नेहसंमेलनाचे. पाचेगाव केंद्रांतर्गत असणारी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असून देखील शाळेमधील विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर आधारित एकाहून एक सरस नृत्य सादर करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. धमाल, आनंद, उत्साह या सोबतच अतिशय तालबद्ध आणि शिस्तबद्ध कार्यक्रमासोबतच ग्राफिक्स, सुंदर फोटोग्राफी आणि नीटनेटके नियोजन आणि भव्य रंगमंच यामुळे कार्यक्रमाची रंगत उत्तरोत्तर वाढत गेली.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी गावातील प्रथम नागरिक सरपंच सौ अलकाताई नंदू गाडे, उपसरपंच सौ. अंजलीताई रंगनाथ घोलप, माजी सरपंच तथा उद्योजक मुंबई मा.श्री. मोतीरामजी गाडे, उद्योजिका सौ अनिता मोतीराम गाडे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर नांदुरकर, पोलीस पाटील सुदामराव गाडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोलभैया गाडे, शारदा कोचिंग क्लास गेवराईचे संचालक प्राध्यापक शिवाजी वराट, गावातील शिक्षण भूषण प्रा. अनंत घोलप गुरुजी, विष्णू आडे, व्हाईस चेअरमन, अर्जुन बारगजे, बाळासाहेब दहिफळे, नितीन तिबोले, जितेंद्र दहिफळे, विकास घोडके, सचिन दाभाडे, सर्व संचालक शिक्षक सहकारी पतसंस्था गेवराई, केंद्रप्रमुख नामदेव शिंदे, केंद्राचे केंद्रप्रमुख अंगद काकडे, मुख्याध्यापक गणेश फड माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष नारायण गाडे, तसेच राज्य पुरस्कार प्राप्त महादेव चव्हाण, संतोष पडोळे, विकास परदेशी यासह शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे या सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करून जल्लोष २०२६ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत कुलथे यांनी आजपर्यंत शाळेतील विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांच्या प्रयत्नामुळे शाळेचा झालेला विकास, विद्यार्थी गुणवत्ता, तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात केंद्रात प्रथम क्रमांक शाळेने प्राप्त केल्याचे तसेच विनोबा ॲपमधील उपक्रम शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या सहभागातून उत्कृष्टपणे सादर केल्यामुळे शाळेचा केंद्र, तालुका, आणि जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केल्याचे यासोबतच आगामी काळातही शाळा कोणकोणते उपक्रम राबवणार आहे याविषयी माहिती विशद केली. यानंतर सत्काराला उत्तर देताना शिक्षक सहकारी पतसंस्था गेवराईचे संचालक यांनी जिल्हा परिषद शाळेतील आयोजित होणाऱ्या अशा कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कला गुण विकसित होतात असे विशद केले. ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी भीमाशंकर नांदुरकर यांनी शालेय शिक्षणासोबतच सहशालेय उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विविध गुणांचा विकास होण्यास मदत होते तसेच संगीत नृत्य नाट्य अशा कलेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो त्यामुळे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शाळा स्तरावर घेतले जावे असे प्रतिपादन केले. शारदा कोचिंग क्लासेस संचालक शिवाजी वराट यांनी इंग्लिश स्कूल पेक्षाही उत्कृष्टपणे आणि प्रभावी असणारे कलामंच आणि तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करत एलईडी स्क्रीन आणि व्हिडिओ ग्राफिक्स हे प्रथमच एका जिल्हा परिषद शाळेमध्ये पाहिल्यामुळे आयोजकाचे विशेष कौतुक केले. जल्लोष २०२६ या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनाने झाली. शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर समूहनृत्य, तसेच चालू घडामोडी वर आधारित नाट्यछटा सादरीकरणातून आपली कला आत्मविश्वास आणि सर्जनशीलता प्रभावीपणे सादर केली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या समूह नृत्यांमध्ये प्रामुख्याने दैवत छत्रपती, लल्लाटी भंडार, शंभू वंदना, लुंगी डान्स, आदिवासी नृत्य, गोंधळ, भारुड, पोतराज गीत, शिवतांडव, मेरी मा, स्कूल चले हम, कोळीगीत यासह महाराष्ट्राच्या लोकधारेमध्ये सादर केलेल्या वासुदेव, पोतराज, धनगर गीत, डोंबारी, लावणी, गवळण, महाराष्ट्र गीत समूहनृत्याने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला. प्रत्येक सादरीकरणाला उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट आणि भरभरून दाद दिली जात होती. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका राधिका अंबिलवादे, गोरख काळे तसेच तुकाराम पवार यांनी केले. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा जल्लोष २०२६ हा सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. पालक व नागरिकांच्या उस्फुर्त उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे मनोबल आणि आत्मविश्वास उंचावला असून संपूर्ण कार्यक्रम उत्साह, आनंद आणि सकारात्मकतेच्या वातावरणात संपन्न झाला.

**जल्लोष २०२६ मध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्काराला गावातील उपस्थित सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ, माता भगिनी, पालक शिक्षण प्रेमी नागरिक यांनी उत्स्फूर्त दाद देत शाळेला तब्बल ६१ हजार रुपये बक्षीस स्वरूपात भेट दिले. शाळेमध्ये आयोजित केलेल्या आजपर्यंतच्या कार्यक्रमासाठी गावकऱ्यांनी दिलेली आजपर्यंत सर्वात मोठी रेकॉर्ड ब्रेक रक्कम ठरली हे विशेष.**

# 'णमोकार तीर्थावर' पाच मुनीश्रींना आचार्यपद बहाल, तर दोघांना 'संघ प्रवर्तक' पदवी!



राजेंद्र आजमेर । छ.संभाजी नगर

**येथील पवित्र णमोकार तीर्थ क्षेत्रावर सुरू असलेल्या भव्य पंचकल्याणक महोत्सव व महामस्तकाभिषेक सोहळ्यात आजचा दिवस सुवर्ण अक्षरांनी कोरला गेला. मोक्ष कल्याणक दिनाचे औचित्य साधून गणधराचार्य श्री कुंथुसागरजी महाराज आणि आचार्य श्री देवनंदिजी महाराज यांच्या मंगल मंत्रोच्चारात पाच मुनीश्रींना 'आचार्य पद' प्रदान करण्यात आले. या ऐतिहासिक सोहळ्याने संपूर्ण परिसर 'गुरुदेव' मय झाला होता.**

गेल्या ६ फेब्रुवारीपासून णमोकार तीर्थावर विविध धार्मिक कार्यक्रमांचे अत्यंत उत्साहात आयोजन केले जात आहे. आजच्या विशेष सोहळ्यात मुनीश्री पावनकीर्तीजी, जयकीर्तीजी, शुभमकीर्तीजी, सकलकीर्तीजी आणि आर्षकीर्तीजी महाराज यांना आचार्य पदाची दीक्षा देण्यात आली. आता या पाचही मुनीश्रींना अनुक्रमे आचार्य श्री पावननंदीजी, आचार्य श्री जयनंदीजी, आचार्य श्री शुभमनंदीजी, आचार्य श्री सकलनंदीजी आणि आचार्य श्री आर्षनंदीजी महाराज म्हणून संबोधले जाणार आहे. या प्रसंगी उपस्थित हजारो भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात मुनीश्रींचे अभिनंदन केले. ''जगद्गुरु की जय'', ''जयकारा गुरुदेव का'' अशा घोषणांनी संपूर्ण तीर्थक्षेत्र दुमदुमून गेले होते. याच मंगलमयी सोहळ्यात युगल मुनीश्री अमोघकीर्तीजी व अमरकीर्तीजी यांना 'संघ प्रवर्तक' ही गौरवशाली पदवी बहाल करण्यात आली. या सोहळ्यामुळे जैन धर्मीय बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून, णमोकार तीर्थाच्या कीर्तीत मोलाची भर पडली आहे. महोत्सव विविध धार्मिक विधी आणि महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. आज पासून भव्य महामस्तकाभिषेक प्रारंभ झाला असून देश विदेशातील जैन बांधव ह्या साठी उपस्थित होत आहेत २५फेब्रुवारी पर्यत हा महोत्सव चालणार आहे



## 'गाव तिथे शाखा' उपक्रमाला वेग; उदयसिंह बोराडे यांचा संघटन बळकटीचा निर्धार

मंठा । प्रतिनिधी

तालुक्यातील केहाळ वडगाव येथे दि. १२ फेब्रुवारी रोजी शिवसेना पक्षाच्या नव्या शाखेचे भव्य उद्घाटन तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. ''गाव तिथे शाखा'' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाला गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग, तरुण कार्यकर्ते तसेच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे म्हणाले की, शिवसेना ही केवळ राजकीय संघटना नसून ती सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी लढणारी चळवळ आहे. 'गाव तिथे शाखा' हा उपक्रम म्हणजे गावागावात शिवसेनेची ताकद वाढवण्याचा निर्धार आहे. शेतकरी, तरुण, महिला आणि वंचित घटकांच्या न्यायासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध राहील असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमास उपतालुकाप्रमुख रामराव वरकड, उपतालुकाप्रमुख अक्षयदीप वाघमारे, युवासेना तालुकाप्रमुख दीपक गायकवाड, दलित आघाडी तालुका प्रमुख दिलीपराव हिवाळे, युवासेना उपतालुकाप्रमुख विजय चव्हाण, युवासेना शहरप्रमुख ॲड. राजेश खरात, शिवसेना उपशहरप्रमुख बंडू नाना बोराडे, शिवसैनिक भगवानराव गायकवाड, पप्पू बोराडे तसेच नवनियुक्त शाखा पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ना.पंकजा मुंडे यांचा नगरसेवक ॲड.गोविंद शिराळे यांचेकडून सत्कार

बीड । प्रतिनिधी

परळी येथे जाऊन बीड येथील नगरसेवक ॲड.गोविंद नवनाथ शिराळे पाटील यांनी राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांचा नगरसेवक म्हणून संधी दिल्याबद्दल हृदयपूर्वक सत्कार परळी येथे जाऊन केला व नंतर पंकजाताई यांनी नगरसेवक ॲड.गोविंद शिराळे पाटील यांना सांगितले की आपल्यावर खूप मोठी बीड शहराची लोकांचे काम करण्याची जबाबदारी आहे ती जबाबदारी आपण लोकांचे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडून त्यांना बीड नगरपालिकेच्या माध्यमातून सर्व सामान्य लोकांना न्याय देऊन आपल्यावर टाकलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडा अशा सूचना देखील यावेळी नामदार



श्रीमती पंकजाताई मुंडे यांनी केल्या या व पुढील उत्कृष्ट त्यांच्या हातून होणाऱ्या बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांच्या बीड नगरपालिकेच्या माध्यमातून होणाऱ्या कार्याच्या सेवेसाठी श्रीमती नामदार पंकजाताई मुंडे यांनी देखील नगरसेवक ॲड. गोविंद शिराळे पाटील यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजप नेते व माजी सभापती नवनाथ शिराळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्षा मिराताई गाधले उपस्थितत होते.

पान १ वरून...

### उत्तम रोजगार निर्मितीसाठी कृषी

गरज आणि संपत्ती म्हणून जपून वापर करण्याची वेळ शेतकऱ्यांसह तुम्हा आम्हावर निर्माण झालेली आहे. गोमातेच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत असंख्य लाभ शेती आणि माणसाला होतात यातूनच गोमूत्र सेना पासून अनेक प्रकारचे विविध वस्तू तयार केल्या जात आहेत. ही एक प्रकारची मोठी बाजारपेठ शेतकऱ्यांपुढे खुली झालेली आहे, त्यामुळे पुन्हा शेतकऱ्यांनी शेती आणि पशुधन सांभाळण्याकडे वळणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. रासायनिक खतामुळे शेतीची उत्पादकता कमी झालेली आहे जमिनीची देखील परिस्थिती नापिकीकडे जात आहे परिणामी शेतीसाठी केलेला खर्च हा अधिक होत असून शेतकऱ्यांना उत्पादकता ही कमी होत आहे, यामुळे शेती संकटात येऊ लागली आहे. यात बदल घडून आणण्यासाठी जीवामृत प्रयोग शेतीमध्ये करणे गरजेचे आहे. नवे चांगले दिवस निर्माण करू शकतील असा आधार शेतकऱ्यांमध्ये निर्माण होत आहे. नैसर्गिक शेतीचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे, कमी खर्चामध्ये विषमुक्त अन्नधान्य निर्माण होत आहे यातून मिळणारी मिळकत ही उत्पादकता वाढवण्यासाठी आणि आर्थिक उत्पन्न चा लाभ देण्यासाठी शेतकऱ्यांना उपयुक्त आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे असे आवाहन देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

-------------

### माजी मंत्र्यांच्या कॉलेजवरील

पाटोदा महिला शाखेकडून आठ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते, मात्र हे कर्ज अद्यापही बँकेला दिले गेले नसल्याने बँकेने या महाविद्यालयाच्या जागेचा ताबा घेतला आहे. तशी नोटीसही वृत्तपत्रात प्रकाशित केली गेली आहे. विशेषतः आमदार संदीप क्षीरसागर यांच्यासह या महाविद्यालयाचे माजी प्राचार्य दत्तात्रय आघाव, नंदकुमार पटाईत या दोन साक्षीदारांना ही नोटीस पाठवण्यात आली आहे. नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम आठ कोटी २६ लाख २५१६ रुपये व त्यावर दिनांक ९ जून २०२५ पासून पुढे होणारे व्याज व इतर खर्च ६० दिवसाच्या आत भरणा करण्यासाठी नोटीस दिली होती. मात्र सदर रकमेचा भरणा न केल्यामुळे नोटीस द्वारे कर्जदार, जामीनदार व सर्व जनतेला सूचित करून कलम १३ ४ व नियम आठ नुसार प्राधिकृत अधिकारी यांनी २९ सप्टेंबर २०२५ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला. त्यामुळे कर्जदार किंवा साक्षीदार यांनी या जमिनीची कोणतीही खरेदी - विक्रीचा व्यवहार किंवा करार करू नये. केल्यास त्यावर द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँक बीड शाखा महिलाचे कर्ज रक्कम आठ कोटी २६ लाख व त्यावर व्याज याचा बोजा असेल असेही नोटीसित नमूद केले आहे.

---------------

### उपमुख्यमंत्री सुनेत्राताई, पार्थ व जय

त्यानंतर या तिघांनीही पुण्यातील सर्किट हाऊसवर जाऊन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. तिथेही या चौघांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेचा अधिकृत तपशील समजू शकला नाही, पण ही चर्चा राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण तथा राज्यातील विद्यमान राजकीय घटनाक्रमाशी संबंधित असल्याचा दावा केला जात आहे. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पक्षाची सर्व सूत्रे सुनेत्रा पवार यांच्याकडे आली आहेत. त्यामुळे त्या अजित पवारांच्या पावलावर पाऊल टाकत राजकीय रणनितीकार नरेश अरोरा यांचे मत लक्षात घेऊन पुढील निर्णय घेण्याच्या विचारात असल्याचा दावा केला जात आहे. या बैठकीदरम्यान नरेश अरोरा यांनी स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या आतापर्यंतच्या संपर्कातील माहिती सांगितली नसल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री सुनेत्राताईंनी सल्ला किंवा यावर फार काही बोलायचे टाळले असल्याचे दिसत आहे. एक प्रकारे त्यांच्याबरोबरच्या चर्चेला सुनेत्राताई, जय पवार आणि पार्थ पवार यांनी यु टर्न दिला असल्याचे दिसत आहे.

-----------

### टिपू सुलतान-शिवाजी महाराज

छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापन केले, मोगलांच्या जोखडातून सामान्य माणसाला मुक्त करण्याचे काम केले आणि खऱ्या अर्थाने सामान्य रयतेचे राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवराय होते. त्याचवेळी हजारो, लाखो हिंदूंची हत्या करणारा टिपू सुलतान याची तुलना करुन दोघांनाही सारखा सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगूलचालन, जोडे चाटणे मी या जन्मात बघितलेले नाही, असा घणाघात देवेंद्र फडणवीस यांनी केला.

--------------

### पुण्यासह जालना, गडचिरोली,

आतापर्यंत हृदयविकाराच्या गंभीर रुग्णांना अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टीसारख्या तपासण्या व उपचारांसाठी खासगी रुग्णालयात जावे लागत होते. त्यामुळे रुग्णांच्या उपचारात विलंब होण्याबरोबरच आर्थिक भार आणि मानसिक तणावही वाढत होता. ही बाब लक्षात घेऊन शासनाने जिल्हा रुग्णालयांमध्ये 'कार्डियाक कॅथलॅब' उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाची अंमलबजावणी जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य सेवा संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने होणार आहे. यामुळे हृदयाच्या रक्तवाहिन्यांमधील अडथळे तातडीने शोधणे व त्यावर त्वरित उपचार करणे शक्य होणार असून, हृदयविकाराच्या रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाच्या 'गोल्डन अवर'मध्ये उपचार उपलब्ध झाल्याने अनेकांचे प्राण वाचण्यास मदत होइल. शासकीय रुग्णालयात ही सुविधा सुरू झाल्यानंतर जिल्हा रुग्णालयातील आरोग्यसेवा अधिक सक्षम व आधुनिक होणार असून, सामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना अत्यल्प खर्चात उच्च दर्जाचे हृदयविकार उपचार मिळणार आहेत.

----------

### शरद पवारांना रुग्णालयातून

सांगण्यात आले आहे. शरद पवारांना डिस्चार्ज देण्यात आल्यानंतर घरी नेण्यासाठी सुप्रिया सुळे आल्या होत्या. रुग्णालयातून खाली आल्यानंतर शरद पवारांनी सगळ्यांना खाली येऊन व्हील चेअरवर हात दाखवला, त्यानंतर त्यांना घरी नेण्यात आले, आता घरामध्ये त्यांना चार ते पाच दिवस विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

-------------

### पहिली ते आठवीच्या

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी जारी केला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा २००९ आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने म्हटले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गामध्ये शिकत असलेल्या ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालकांनी शासनाकडे पाठवला होता. या प्रस्तावानुसार १६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ज्या महानगरपालिकांकडून त्यांच्या स्वतःच्या विद्यार्थ्यांना दप्तर किंवा त्यासाठीची रक्कम दिली जाते, त्या शाळांतील विद्यार्थ्यांना या राज्यस्तरीय योजनेतून वगळण्यात येणार आहे. सरकारकडून आधीच मोफत पाठ्यपुस्तके, मध्यान्ह भोजन यांसारख्या योजना राबवल्या जात असताना आता मोफत दप्तराची भर पडल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना थेट दिलासा मिळणार आहे. मात्र, या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी, दप्तरांचा दर्जा आणि वेळेत वितरण यावरच या निर्णयाचे यश अवलंबून राहणार असल्याची चर्चा शिक्षण क्षेत्रात सुरू झाली आहे. ही योजना 'विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे' या विद्यमान योजनेंतर्गतच राबवली जाणार आहे. दप्तर हे शैक्षणिक साहित्याचा भाग असल्याने त्यासाठीचा खर्च संबंधित निधीतूनच करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे.

-------------

### शासन सेवेत ओबीसी,

जाहिरातीत येणाऱ्या पदांची संख्या कमी होत असल्याने उमेदवारांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात

### श्री दत्त संस्थान बालाघाट येथे महाशिवरात्र उत्सव उत्साहात साजरा होणार

बीड । प्रतिनिधी

श्री दत्त संस्थान बालाघाट, कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही महाशिवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. प.पु.ष.ब्र. श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलुरकर) यांच्या कृपाशीर्वादाने तसेच दत्त उपासक श्री वैजिनाथ महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आज रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.महाशिवरात्र हा भगवान श्री शंकराचा अत्यंत पवित्र



दिवस मानला जातो. या दिवशी पहाटे लवकर भगवान श्री शंकरांना विधीवत महारुद्र अभिषेक करण्यात येणार असून, वेदमंत्रांच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जाणार आहे. त्यानंतर महाआरती संपन्न होईल. भाविक भक्तांना अभिषेक व आरतीचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यावर्षी विशेष आकर्षण म्हणून संगीत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, संगीत क्षेत्रातील मान्यवर कलाकार उपस्थित राहणार आहेत. बालाघाट डोंगर परिसरात होणारा हा कार्यक्रम भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरणार आहे.तसेच महाशिवरात्र पूर्वकाळात विविध धार्मिक उपक्रम राबविण्यात येत असून, दिवसभरात महारुद्र अभिषेक, महाआरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील तसेच बाहेरील भागातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.या पवित्र महाशिवरात्र उत्सवाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन दत्त उपासक श्री वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे.

### अमेरिकेसोबतचा करार शेतकऱ्यांच्या मुळावर –राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे. मात्र केंद्र सरकारने अमेरिकेसोबत केलेला करार हा देशातील शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध असल्याचा आरोप शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आला आहे.



शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताने अमेरिकेसमोर झुकण्याचे कारण काय? अमेरिका त्यांच्या शेतकऱ्यांचे हित जपत आहे; मग भारत सरकार देशातील शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष का करत आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. अमेरिकेतील कापूस, सोयाबीन, दूध, गहू, मका आदी कृषी उत्पादनांवर शून्य टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लावून ती भारतात विक्रीसाठी खुली करणे, तर भारतीय शेतमाल अमेरिकेत निर्यात करताना १८ टक्के शुल्क आकारले जाणे, हा अन्यायकारक व्यवहार असल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे देशांतर्गत पिकांचे भाव घसरून शेतकरी देशोधडीला लागेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. अमेरिकेतील शेतकऱ्यांना त्यांच्या सरकारकडून संरक्षण दिले जात असताना भारतीय शेतकऱ्यांच्या जिवावर हा करार करू नये. तात्काळ हा करार रद्द करण्यात यावा, अन्यथा शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. यावेळी माजी सैनिक अशोक येडे, डॉ. गणेश ढवळे, बाळासाहेब मोरे, कुलदीप करपे,गणेश नाईकवाडे, अर्जुन सोनवणे, राजू गायके, राजेंद्र वीर, खाजाभाई पठाण, माऊली शिंदे, दत्ता सुरवसे, सुहास जायभाये, मोहन गव्हाणे आदी उपस्थित होते.

## कपिलधारमध्ये 'आपदा मित्रसखी' प्रशिक्षण कार्यक्रम सुरु ; ग्रामसुरक्षेसाठी सज्ज स्वयंसेवकांची नवी फौज

बीड । प्रतिनिधी

येथे ११ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले ' आपदा मित्रसखी ' प्रशिक्षण केवळ एक औपचारिक उपक्रम न राहता ग्रामसुरक्षेच्या नव्या युगाची नांदी ठरले आहे . '' आपत्ती आली तर घाबरायचे नाही , सज्ज व्हायचे आणि वाचवायचे '' या प्रेरणादायी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून युवक , युवती , महिला आणि मच्छिमार बांधवांनी मोठ्या उत्साहात या प्रशिक्षणात सहभाग नोंदवला आहे . ग्रामपातळीवर स्वयंसेवकांची सक्षम फौज तयार करून आपत्ती व्यवस्थापनात स्वयंस्फूर्ती निर्माण करण्याचा हा उपक्रम ग्रामसुरक्षेचा नवा अध्याय लिहिणारा ठरत आहे .



राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या मार्गदर्शनाखाली , राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण , राज्य आपत्ती प्रतिसाद दल मुंबई आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण बीड यांच्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे . शासन आणि प्रशासनाच्या समन्वयातून राबविण्यात आलेला हा उपक्रम ग्रामीण भागातील आपत्ती सज्जतेसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे .

या प्रशिक्षण कार्यक्रमास आपत्ती प्रतिसाद दलाचे डेप्युटी कमांडंट अशोक कुमार यांची विशेष उपस्थिती लाभली . त्यांच्या उपस्थितीमुळे प्रशिक्षणाला शिस्त , प्रेरणा आणि उत्साह मिळाला . त्यांनी स्वयंसेवकांशी संवाद साधत आपत्तीच्या काळात नागरिकांची भूमिका किती महत्त्वाची असते , यावर प्रकाश टाकला .

आपत्ती प्रतिसाद दलाच्या पाचव्या तुकडीतील निरीक्षक राजेंद्र कांबळे यांनी प्रभावी मार्गदर्शन करत प्रशिक्षणार्थींमध्ये आत्मविश्वास जागवला . बचावकार्याच्या प्रत्यक्ष तंत्रांपासून ते आपत्कालीन परिस्थितीत निर्णयक्षमता कशी वाढवायची , याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले . सहायक निरीक्षक खुंटे यांनीही उत्साही सत्र घेत दोरीच्या साहाय्याने बचाव , पूरस्थितीत सुटका , प्राथमिक उपचार आणि आपत्कालीन समन्वय याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखवली . प्रशिक्षणार्थींनी या सत्रांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले . जिल्हा प्रशासनाच्या दूरदृष्टीतून आणि नियोजनातून हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात आला . निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी ग्रामपातळीवरील आपत्ती सज्जतेचे महत्त्व अधोरेखित करत स्वयंसेवकांना जबाबदारीची जाणीव करून दिली . त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी उपस्थितांमध्ये आत्मविश्वास आणि सेवाभाव वाढीस लागला . बीडचे तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी चंद्रकांत शेळके यांनी प्रशिक्षणार्थींना संबोधित करत प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय किती आवश्यक आहे हे स्पष्ट केले . त्यांनी सांगितले की , आपत्तीच्या काळात शासन यंत्रणा तातडीने कामाला लागते , परंतु ग्रामपातळीवर सज्ज स्वयंसेवक असतील तर बचावकार्य अधिक जलद आणि प्रभावी होते . त्यांच्या ठाम आणि सकारात्मक मार्गदर्शनामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये शिस्त , सजगता आणि समाजसेवेची भावना अधिक दृढ झाली . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही मार्गदर्शन करत महिलांचा सहभाग वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले .

## कार्यशाळा आणि सराव परीक्षेमुळे यश; आदित्यचे विद्यार्थी टीईटीत अव्वल



बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत आदित्य अध्यापक महाविद्यालय व आदित्य विद्यालयातील विद्यार्थ्यांनी – २०२५ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला नवा गौरव प्राप्त करून दिला. कार्यशाळा आणि सराव परीक्षेमुळे हे यश मिळाले. या यशामागे तज्ज्ञ मार्गदर्शक प्राध्यापकांचा मोठा वाटा आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

शेरिन बेगम सदुल्ला,मोटे आकांक्षा अशोक,घुमरे सुनंदा लक्ष्मणराव,बागलाने प्रतिभा,आफरीन बेगम कलीम शेख,सोनवणे महेश रामकिसन,घोडके अनिकेत नारद,संदिप कागदे,परजणे सुरेश लक्ष्मण,रोमन दीपक श्रीराम व शेंबडे अक्षय दादासाहेब या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२५ व २०२५–२६ मध्ये प्रवेश घेतल्यानंतर सातत्यपूर्ण परिश्रमाच्या जोरावर हे यश संपादन केले.

संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व डॉ. अदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, आंबेजोगाई येथील ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. राजेश गोरे यांच्या उपस्थितीमध्ये विशेष टीईटी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. दर महिन्याच्या बुधवारी नियमित सराव परीक्षा घेण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. प्राचार्य मनिषा बावणे, प्रा. बी. एस. जगताप, प्रा. आर. ए. कारगुडे, प्रा. आय. आर. सय्यद व प्रा. एम. सी. चावर यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. छात्रसेवा शिबिरे, सराव पाठ व विविध शाळांमधील अध्यापन उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाली. याच सर्वसमावेशक प्रयत्नांचे फळ म्हणून विद्यार्थ्यांनी टीईटी परीक्षेत यश मिळवले.

**महाविद्यालयामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढला**

टीईटीत परीक्षेत विद्यार्थांनी जेव्हा यश संपादन केले तेव्हा त्यांचे पालक घोडके नारद, रोमन श्रीराम, घुमरे लक्ष्मण, शेख कलीम व सोनवणे रामकिसन म्हणाले की, महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या टीईटी मार्गदर्शन कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला. नियोजनबद्ध अभ्यास पद्धती व सराव परीक्षेमुळे मुलांचा आत्मविश्वास वाढल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. आदित्य अध्यापक महाविद्यालय हे शिक्षक घडविणारे महाविद्यालय असल्याच्या प्रतिक्रीया पालकांनी व्यक्त केल्या.

**प्राध्यापकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, विद्यार्थांचे यश**

विद्यार्थांचे पालक दादासाहेब शेंबडे , लक्ष्मण परजणे व अशोक मोटे यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तम यश मिळाल्याचे सांगत संस्थेचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## वडवणी शहरात विद्यार्थिनींना त्रास देणाऱ्या रोडरोमिओंवर कारवाईची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरात शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींना रोडरोमिओंकडून होत असलेल्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पोलीस निरीक्षकांना लेखी निवेदन देत चिडीमार/दामिनी पथकाची तात्काळ नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.



वडवणी तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातून अनेक विद्यार्थिनी शालेय, महाविद्यालयीन तसेच स्पर्धा परीक्षा व इतर कोचिंग क्लासेससाठी शहरात येत असतात. मात्र शहरातील शाळा, महाविद्यालय परिसर, बसस्थानक आणि कोचिंग क्लासेसच्या आसपास काही तरुणांच्या टोळक्यांकडून अश्लील हावभाव व मानसिक छळाचे प्रकार घडत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. या प्रकारांमुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षणावरही त्याचा परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधितांवर कडक कारवाई करून शाळा, महाविद्यालये, बसस्थानक व क्लासेस परिसरात नियमित पोलीस गस्त वाढवावी, तसेच विशेष पथक नेमून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तरी या

मागण्यांकडे तात्काळ लक्ष न दिल्यास राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही महादेव सावंत यांनी दिला आहे.सदर निवेदनाच्या प्रती मा. देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, प्रकाश दादा सोळंके (आमदार, माजलगाव मतदारसंघ) तसेच बीड येथील पोलीस अधीक्षक बीड यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## बीड जिल्ह्यातील अशोक तंबरे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

नालंदा ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून नालंदा ग्रामसमृद्धी सन्मान सोहळा २०२६ आज पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम विशेष ऐतिहासिक ठरला, कारण त्यात अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या मुख्य अतिथींच्या यादीत जितेंद्र दाते सर, ए आर जे ग्रुपचे चेअरमन, माधुरीताई शेटे केके हॉस्पिटलच्या सीईओ आणि महेश नेमणे सर यांचा समावेश होता. त्यांनी उपस्थितांना प्रेरणादायक भाषणे केली आणि नालंदा ग्रामच्यासमृद्धीसाठी केलेल्या कार्याबद्दल योगदान दिल्याबद्दल विविध व्यक्तींना पुरस्कार प्रदान केले.यात बीड जिल्ह्यातील अशोक तंबरे यांना आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून सन्मानित करण्यात आले आहे

या समारंभात सामाजिक आणि शैक्षणिक योगदानाबाबत विविध पुरस्कार दिले गेले, ज्यामुळे नालंदा ग्रामाची समृद्धी आणि विकास संस्थेकडून जोपासली जात आहे यावर जोर देण्यात आला.नालंदा



ऑर्गनायझेशनच्या या उपक्रमामुळे स्थानिक समुदायात जागरूकता निर्माण झाली आणि प्रभावित लोकांना त्यांच्या कार्यासाठी मान्यता मिळालेली आहे, यामुळे सर्वांच्या मनात आनंद आहे.या ऐतिहासिक कार्यक्रमात सर्व उपस्थित व्यक्तींनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

## आष्टीत दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तराचे ऑनलाईन उद्घाटन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठ सरांचे स्थापना झालेल्या परिसरातील पक्षकारांना न्यायासाठी बीड येथे वारंवार जावे लागणार नाही त्यामुळे त्यांचे वेळ आणि पैशाचा होणारा अपय मोठ्या प्रमाणावर टाळणार असून न्यायप्रवेश अधिक सुलभ होणार आहे या न्यायालयाच्या स्थापनेमुळे आष्टीने न्यायव्यवस्थेमध्ये क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण झेप घेतली असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे पालक न्यायमूर्ती किशोर संत यांनी केले

आष्टी येथे बीड जिल्हा अंतर्गत दिवाणी न्यायालय वरिष्ठ सरांचे ऑनलाईन उद्घाटन शनिवारी १४ सकाळी साडेअकरा वाजता मुंबई उच्च न्यायालयाचे पालक न्यायमूर्ती किशोर संत व न्यायमूर्ती रवींद्र जोशी यांच्या हस्ते पार पडले यावेळी जिल्हा न्यायमूर्ती आनंद यावलकर महाराष्ट्र गोवा बार कौन्सिल सदस्य वसंत साळुंखे ,अहमद खान उस्मान खान नव्याने नियुक्त देवांनी न्यायालयाच्या प्रथम न्यायाधीश श्रीमती ई बी निवारे यांच्यासह विविध मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताव राष्ट्रीय वकील संघाचे अध्यक्ष एडवोकेट सय्यद ताहेर सय्यद जमाल यांनी केले पालक न्यायमूर्ती किशोर संत यांनी ऑनलाइन मार्गदर्शन करताना सांगितले की न्यायालयाचा इतिहास अत्यंत समृद्ध असून येथील वकिलांनी न्यायालयाची प्रतिष्ठा आणि नाव उंचावण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे आष्टीत न्यायालयात केवळ स्थानिक वकीलच नव्हे तर बाहेरील वकिलांची येऊन काम करण्याची संख्या देखील अधिक आहे न्यायालयाची स्थापना व केवळ बार कौन्सिल यश नसून त्यामागे न्यायाधीशांचे मार्गदर्शन आणि वकिलांचे सातत्यपूर्ण प्रयत्नही तितकेच महत्त्वाचे



आहेत वकिलांनी आपल्या या वयाची प्रतिष्ठा जपत न्यायालयाची विश्वासार्हता आणि सामान्य अधिक वृद्धिगत करण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे आव्हान त्यांनी केले न्यायमूर्ती रवींद्र जोशी यांनी आपल्या मार्गदर्शनातून नमूद केले की सध्याचे पक्षकार अधिक जागरूक आणि सुजाण झाले असून न्यायदान प्रक्रियेमध्ये वकील आणि न्यायाधीशा दोघांची जबाबदारी तितकीच महत्त्वाची असणार आहे महाराष्ट्रातील अनेक न्यायालयामध्ये वकिलांना बार रूममध्ये बसणे ऐवजी बाहेर पक्षकरांची प्रतीक्षा करावी लागते ही एक बाब न्यायव्यवस्थेसाठी चिंताजनक असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली बीड जिल्हा न्यायमूर्ती आनंद यावलकर यांनी सांगितले की नव्याने सुरू दिवाणी न्यायालय वरिष्ठ सरांचे नियमित कामकाज सोमवारपासून सुरू होणार असून या न्यायालयात कोणत्याही रकमेची दिवाणी दावे दाखल करता येणार आहेत बीड येथून एकूण १३०८ प्रकरणे आष्टी न्यायालयाकडे वर्ग करण्यात आले आहेत या न्यायालयामध्ये नागरिकांना न्यायासाठी दूरवर जाण्याची गरज भासणार नाही त्यांच्या वेळेवर आर्थिक खर्चातही बचत होणारा या उद्घाटन समारंभास मतदार संघाचे आमदार सुरेश धस माजी आमदार भीमराव धोंडे माजी आमदार साहेबराव दरेकर माजी आमदार बाळासाहेब आजबे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शरद पवार गट महबूब शेख नगराध्यक्ष जीआबे, उपनगर अध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे यांच्यासह अनेक राजकीय मान्यवर पदाधिकारी अधिकारी वकील तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते आष्टी येथे दिवाणी न्यायालय वरिष्ठताराची स्थापन झाल्याने स्थानिक नागरिकांसाठी न्यायप्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ संघटित होण्यास मदत होणार असून न्यायव्यवस्थेच्या बळकटी करण्याच्या दृष्टीने ही एक महत्वपूर्ण टप्पा मानला आहे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पीबी इनामदार यांनी केले तर आभार न्यायाधीश श्रीमंती एबी निवारे यांनी मांडले .

## पान ६ वरुन...

### पत्नी बेपत्ता झाल्याची खोटी

११२ ही आपत्कालीन सुविधा नागरीकांच्या आपत्कालीन परिस्थीतीत मदत पोहचविण्यासाठी सुरु केलेली असतानाही ईसम नामे गोविंद गजेंद्र भारती रा. हेळंब ता. परळी वै जिल्हा बीड याने पोलीसांना त्रास व्हावा या उद्देशाने वारंवार सदर सुविधेवर कॉल करुन पोलीसांना खोटी माहिती दिली म्हणुन नमुद ईसमाविरुध्द पोलीस ठाणे परळी ग्रामीण येथे दिनांक १२/०२/२०२६ रोजी गु.र.नं.६९/२०२६ कलम २१२,२२३ भारतीय न्याय संहीता सह कलम ८५ (१) महाराष्ट्र दारुबंदी कायद्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नागरीकांना आव्हान करण्यात येते की, डायल ११२ ही सुविधा आपत्कालीन सुविधा असुन यावर कॉल करुन खोटी माहिती दिल्यास अथवा विनाकारण वारंवार कॉल केल्यास अशा इसमाविरुध्द कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

### गोवंश मास विक्री करणाऱ्या

घेऊन सिलंबद करून उर्वरीत गोमांस सुरक्षीत स्थळी नष्ट करण्यात आले. सदर कारवाईत एकूण ६०,४००/–रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हे दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवतीत काँवत,अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक अनिल कटके, पोलीस निरीक्षक किशोर पवार, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि.सतीष कोटकर, सपोनि. अण्णासाहेब पवार, सपोनि. दिपक लंके, पोह/१३१७ चंद्रसेन माळी, पोह/३७० दिलीप सरवदे, पोह/९५४ हंबर्डे, पोकॉ/२११२ जितेंद्र ओव्हाळ व पोकॉ/२४१ गोरक्ष डोके यांनी केली.

### भारत स्काऊट्स आणि

फूड प्लाझा (आनंद नगरी), शोभायात्रा, सर्वधर्मीय प्रार्थना आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जिल्हाभरातील २५ शाळांनी या मेळाव्यात सहभाग नोंदवला. एकूण २९० स्काऊट, २५२ गाईड, २२ स्काऊटर, १५ गाईडर तसेच नियोजन समितीतील ३० सदस्य असा मिळून ६०९ जणांचा लक्षणीय सहभाग लाभला. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

मेळाव्याचा समारोप जिल्हा चिटणीस श्री रंगनाथ राऊत यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मेळावा प्रमुख म्हणून श्री विठ्ठल शिरसाठ यांनी तर मेळावा संचालक म्हणून श्री मोहन शेळके यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सूत्रसंचालन श्री दीपक बिल्पे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गजानन चौकटे यांनी मानले.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांमधील स्काऊट व गाईड सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले. श्री दादाराव काकडे, सिद्धेश्वर मस्के, नितीन कुलथे, नितीन माळी, बापू शिंदे, प्रमोद धुर्वे, गजानन चौकटे, शिवदास पुरी, मुकुंद मैंद, प्रकाश गोरे, हनुमान बडे तसेच गाईड सदस्यांमध्ये श्रीमती प्रभावती अवचर, अनिता जोगदंड, मनीषा जाधव, वंदना हिरे, सुनिता घुगे, अस्मिता वाघमारे, आयोध्या पांचाळ, पुष्पा झिंजुर्के, रंजना जोशी आदींचा सक्रिय सहभाग लाभला.मेळावा यशस्वीतेसाठी जिल्हा कार्यालयाचे जिल्हा संघटक श्री योगेश आवढाळ, काझी मॅडम, त्रिगुणा वाघमोडे, श्री ज्ञानेश्वर धंदारे, चाटे आदींनी विशेष परिश्रम घेतले. दोन दिवस चाललेल्या या भव्य–दिव्य सोहळ्यामुळे जिल्ह्यातील स्काऊट–गाईड चळवळीला नवे बळ मिळाल्याची भावना उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

### चेक बाऊन्स प्रकरणी

प्रभावी युक्तिवाद सादर केला. आरोपीचा बचाव खोटा असल्याचे सिद्ध करत त्यांनी जास्तीत जास्त शिक्षेची मागणी केली. न्यायालयाने सर्व पुरावे ग्राह्य धरून १३ फेब्रुवारी २०२६ रोजी निकाल दिला. यामध्ये आरोपी भागवत आलाट यास सहा महिने साधी कैद आणि २ लाख ८० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून, दंडाची संपूर्ण रक्कम नुकसानभरपाई म्हणून फिर्यादीस देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या यशस्वी निकालामुळे ॲड. खलील शेख यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### इंग्लिश स्कूल मधून

की,माजी आमदार केशवदादा आंधळे यांनी ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजीतून शिक्षण घेता यावे म्हणून प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलची २००९ स्थापना केली आज या इंग्लिश स्कूल मधून दर्जेदार शिक्षण मुलांना दिले जात आहे असे बोलून वार्षिक स्नेहसंमेलनाला त्यांनी शुभेच्छा दिल्या तसेच उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले त्यानंतर वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष माजी आमदार केशवराव आंधळे यांनी इंग्लिश स्कूलमध्ये विविध उपक्रम राबवले जातात त्यांचे कौतुक करून शिक्षिकांचे अभिनंदन केले व वार्षिक स्नेहसंमेलनाला शुभेच्छा दिल्या. देशभक्तीपर गीत,बंजारा गीत,लावणी,कोळीगीत तसेच मराठी,हिंदी चित्रपटातील गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.उत्कृष्ट नृत्य सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या शोभाताई के.आंधळे यांनी केले तर सूत्रसंचालन दीपा फासे मॅडम व प्रणिता तांबडे मॅडम यांनी केले व आभार उपप्राचार्य मस्के सर यांनी मानले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गणेश वारे सर तसेच इंग्लिश मधील सर्व शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

### वाढदिवसाचा अपव्य खर्च

सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्त्व

परिवंत गायकवाड हे यशस्वी उद्योजक असून सामाजिक जाणीव असलेले संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. जयदीप कन्स्ट्रक्शनच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण, आरोग्य, धार्मिक व सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून गरजू घटकांना मदतीचा आधार दिला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण कार्यामुळे ते समाजात विश्वासार्ह व प्रेरणादायी सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत.

मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क–हेवडगावच्या सरपंच तथा कडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका सौ. वंदना परिवंत गायकवाड होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सय्यद अल्लाउद्दीन, आष्टीचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, सरपंच परिषदेचे राज्याध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, रिपाई नेते अरुणभैय्या निकाळजे, गणेश नाना शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य अशोक मुळे, नगरसेवक सुरेश वारंगुळे, सुरेश पवार, उत्तम बोडखे, अविनाश कदम, मिलिंद निकाळजे आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुजाता झगडे, उपाध्यक्षा प्रभा वायकर, विद्या डोंगरदिवे, जयश्री धोंडे, उज्वला धोत्रे, अनिता लांबडे आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रम उत्साहात संपन्न

कार्यक्रमास मुख्याध्यापक आबासाहेब खताळ, ज्येष्ठ शिक्षक सतीश दळवी यांच्यासह शिक्षकवृंद, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी केले तर आभार प्रदर्शन आदर्श शिक्षक देविदास शिंदे यांनी मानले. शेवटी विद्यार्थिनींना व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.

### आंतरशालेय रंगभरण

मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. बीड शहरातील यशवंत विद्यालयात झालेल्या स्पर्धेत बीड शहरातील १९ शाळांनी सहभाग नोंदवला. तसेच ३२५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव वाघ यांच्या कार्याची आठवण जागवण्यात आली. या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता संबंधित केंद्रांवर करण्यात येणार आहेत. या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राज्यात जमीन महसूल सुनावणी प्रकरणांचा जलद निपटारा होणार

## आता नोटीस मिळणार ईमेल द्वारे

पुणे / प्रतिनिधी

राज्यातील जमीन महसूल सुनावणी प्रक्रियेत पारदर्शकता आणत प्रकरणांचा जलद निपटारा व्हावा, यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण आणि क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदींमध्ये सुधारणा करत आता पक्षकारांना ई-मेलद्वारे नोटिस बजावणे कायदेशीर ठरवण्यात आले आहे.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेल्या या प्रस्तावास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नुकतीच मंजुरी देण्यात आली. जमीनविषयक १२ हजार प्रकरणे प्रलंबित राज्यात सध्या मंत्रालय स्तरावर सुमारे १२ हजार जमीनविषयक प्रकरणे प्रलंबित आहेत. अनेकदा केवळ नोटीस बजावण्याच्या प्रक्रियेमुळे महिनोन्महिने विलंब होत होता. नव्या निर्णयामुळे टपाल व प्रत्यक्ष नोटीस देण्याचा वेळ वाचणार असून, प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. ई-मेल पाठविल्याचा तांत्रिक पुरावा उपलब्ध राहणार असल्याने नोटीस मिळाली नाही ही सबब देता येणार नाही. परिणामी सुनावणीच्या



तारखा पुढे ढकलण्याचे प्रमाण घटेल आणि सामान्य नागरिकांना जलद न्याय मिळेल. महसूल विभागाने यापूर्वी ७/१२ उतारे डिजिटल करणे, फेरफार नोंदी ऑनलाइन करणे यांसारखे यशस्वी उपक्रम राबवले आहेत.

आता नोटीस बजावण्याची प्रक्रिया डिजिटल केल्याने प्रशासनाने पेपरलेस आणि कॅशलेस कारभाराकडे आणखी एक ठोस पाऊल टाकले आहे. आतापर्यंत सुनावणीची नोटीस प्रत्यक्ष हस्तपोच किंवा टपालाद्वारे पाठवली जात होती. मात्र नोटीस न मिळणे, पत्ता न सापडणे किंवा नोटीस स्वीकारण्यास नकार देणे, अशा कारणांमुळे अनेक प्रकरणे रखडत होती. आता कलम २३० मध्ये सुधारणा झाल्याने अधिकृत ई-मेल आयडीवर पाठवलेली नोटीस ही कायद्याने बजावलेली नोटीस मानली जाणार आहे.

भविष्यात या सुधारणा होणार : महसूल विभागाच्या विविध प्रशासकीय कार्यपद्धतीबाबत सुधारणा सुचविण्यासाठी पुणे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २३० मधील तरतुदीत इलेक्ट्रॉनिक मिडीया तंत्रज्ञानाच वापर करावा, अशी शिफारस केली आहे. यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २३० (१) मध्ये नोटीस बजावण्यासाठी लघुसंदेश सेवा (एसएमएस), व्हाटसअॅप मेसेजिंग सर्व्हिस, टेलिग्राम चॅनेल किंवा इलेक्ट्रॉनिक मेल यांचा समावेश करावा, अशी सुधारणा केली जाणार आहे. यासाठी विधि व न्याय विभागाच्या मान्यतेने विधेयकाचे प्रारूप पुढील अधिवेशनात विधिमंडळास सादर करण्यास मान्यता देण्यात आली.




### जागतिक दिवस
### उत्पादकता आठवड्याचा चौथा दिवस

#### महत्वाच्या घटना

३९९ : सॉक्रेटिसला मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.
१७७९ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात स्त्री वकिलांना खटले लढवण्यास परवानगी मिळाली.
१८७९ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात स्त्री वकिलांना खटले लढवण्यास परवानगी मिळाली.
१९३९ : काँग्रेसच्या अध्यक्षपदी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची निवड झाल्यावर मोठा पेचप्रसंग होऊन मतभेद झाले. त्यातून पंडित नेहरुंसह कार्यकारिणीच्या बारा सभासदांनी राजीनामे दिले.
१९४२ : दुसरे महायुद्ध सिंगापुरमध्ये ब्रिटिश सैन्याची शरणागती. ८०,००० भारतीय, ब्रिटिश व ऑस्ट्रेलियन सैनिक युद्धबंदी.
१९६५ : कॅनडाने नवीन ध्वज अंगिकारला.
१९६७ : आजच्या दिवशी भारतामध्ये चौथ्या लोकसभेसाठी निवडणुका घेण्यात आल्या.
१९७६ : मध्य प्रदेश येथे केंद्रीय कृषि अनुसंधान संस्थान ची स्थापना करण्यात आली.
२००० : भारतीय चित्रपट दिग्दर्शक बी.आर चोपड़ा यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देण्यात आला.
२०१० : आजच्या दिवशी प्रसिद्ध नृत्यांगना प्रेरणा श्रीमाली यांना २००९ चा संगीत नाटक अकादमी पुरस्कारासाठी निवडल्या गेले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४ : गॅलेलिओ गॅलिली इटालियन खगोलशास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ८ जानेवारी १६४२)
१७१० : लुई (पंधरावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १० मे १७७४)
१८२४ : यराजेन्द्रलाल तथा राजा मित्रा बंगालमधील प्राच्यविद्या संशोधक, एशियाटिक सोसायटीचे पहिले अध्यक्ष (१८८५), भारतीय चित्रकला, शिल्पकला, राजकीय आणि सामाजिक विषयांवरील भाष्यकार (मृत्यू: २६ जुलै १८९१)
१९२१ : ला प्रसिद्ध इतिहासकार तसेच लेखक राधाकृष्ण चौधरी यांचा जन्म.
१९२४ : आजच्या दिवशी प्रसिद्ध चित्रकार के.जी. सुब्रह्मण्यम यांचा जन्म.
१९३४ : स्विस संगणक शास्त्रज्ञ व पास्कल प्रोग्रामिंग लॅंग्वेज निर्माते निकालूस विर्थ याचा जन्म.
१९४७ : भारतीय चित्रपट अभिनेता रणधीर कपूर यांचा जन्म.
१९४९ : नामदेव लक्ष्मण ढसाळ दलित साहित्यिक (मृत्यू: १५ जानेवारी २०१४)
१९४९ : प्रसिद्ध संस्कृत भाषेचे साहित्यकार राधावल्लभ त्रिपाठी यांचा जन्म.
१९५२ : केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी यांचा जन्म.
१९५६ : डेसमंड हेन्स वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू
१९५४ : प्रसिद्ध हिंदी साहित्यकार अरुण कमल यांचे जन्म.
१९६४ : प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आशुतोष गोवरिकर यांचा जन्म.
१९७९ : हामिश मार्शल न्यूझीलंडचा क्रिकेटपटू
१९८१ : भारतीय अभिनेत्री कविता कौशिक यांचा जन्म.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५५३ : शास्त्रीय संगीतकार सुरेशबाबू माने यांचे निधन.
१८६९ : मिर्झा ग़ालिब ऊर्दू शायर (जन्म: २७ डिसेंबर १७९७)
१९४८ : सुभद्राकुमारी चौहान हिन्दी कवयित्री (जन्म: १६ ऑगस्ट १९०४)
१९५३ : सुरेशबाबू माने किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक (जन्म:१९०२)
१९८० : मनोहर दिवाण कुष्ठरोग्यांची सेवा करणारे पहिले भारतीय (जन्म: )
१९८० : कॉम्रेड एस. एस. मिरजकर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक सदस्य व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) चे अध्यक्ष (जन्म:)
१९८८ : रिचर्ड फाइनमन क्वांटम इलेक्ट्रोडायनॅमिक्स मधील मूलभूत संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक (१९६५) मिळवणारे अमेरिकन पदार्थवैज्ञानिक (जन्म: ११ मे १९१८)
२००८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री मनोरमा यांचे निधन.

# साखर कारखान्यांत शासकीय वजनकाटे बसवा

पुणे : राज्यातील साखर कारखान्यांमध्ये आमदार, खासदार स्थानिक विकास कार्यक्रमातून किंवा प्रत्येक साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून वजनकाटा बसविण्याच्या झालेल्या खर्चाच्या किमतीएवढी रक्कम गाळप झालेल्या उसातून कपात करून तातडीने शासकीय वजनकाटे बसविण्याच्या सूचना साखर आयुक्त संजय कोलते यांनी वैधमापन विभागाच्या नियंत्रकांना पत्रव्यवहाराद्वारे दिली आहे.

या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी पाठपुरावा केला होता. या बाबत शेट्टी म्हणाले, की राज्यातील साखर कारखान्यांमध्ये सर्रास काटामारी व रिकव्हरी चोरी करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची लुबाडणूक केली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या बाबत स्पष्टपणे भूमिका मांडून माहिती दिली आहे. चालू गळीत हंगामात सरासरी एकूण गाळप झालेल्या उसाच्या १० टक्के वजनात घट आलेली आहे. काटामारी बरोबर रिकव्हरी चोरी करण्याचे प्रमाणही वाढल्याने ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूकदार व ऊस तोडणी मजूर दुहेरी संकटात सापडले आहेत. यामुळे राज्यातील सर्व साखर कारखान्याच्या बाहेर राज्य सरकारने संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, साखर सहसंचालक, उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक, वजनमापे नियंत्रक यांच्या नियंत्रणात वजनकाटा उभारण्याची मागणी करण्यात आलेली आहे. वजनकाटा उभा करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनी केली आहे. राज्यातील प्रत्येक साखर कारखान्यामध्ये राज्य सरकारचे वजनकाटे बसविले जातील व हे वजनकाटे डिजिटल, ऑनलाइन प्रणालीने शासनाच्या मुख्य सर्व्हरला जोडण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. चालू वर्षी काटामारी व रिकव्हरी चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून शेतकऱ्यांना यंदा याचा मोठा फटका बसलेला आहे. यामुळे राज्यातील प्रत्येक साखर कारखान्याच्या ५०० टनांपेक्षा जादा ऊस तोडणी झालेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची व वाहतूकदारांची यादी गावनिहाय प्रसिद्ध करण्याची सूचना साखर सहसंचालक यांना देण्यात आली आहे.



# टोमॅटोवरील रोग व किडींचे व्यवस्थापन



टोमॅटो पिकावर भाजीपाला पिकांमधील जवळजवळ सर्व रोग व किडी आढळून येतात. त्यासाठी जर शेतकऱ्यांनी एकात्मिक कीड नियंत्रण राबवले तर बऱ्यापैकी किडींचा बंदोबस्त करता येतो. टोमॅटोवर फुलकिडे, मावा, पांढरी माशी, कोळी, नाग अळी, फळ पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो.

टोमॅटोवरील रोग नियंत्रण : मररोग – हा बुरशीजन्य रोग आहे. या रोगामुळे झाडे अचानक वाळायला लागतात. झाड उपटले असता मुळे कुजलेली दिसतात. रोपवाटिकेतील रोपे मरगळलेली, मान पडलेली दिसतात. ट्रायकोडर्मा व्हीरीडी १.५ टक्के डब्ल्यु.पी. २० ग्रॅम/कि.ग्रॅ. बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.

करपा – करपा हा रोग लवकर येणारा व उशिरा येणारा अशा दोन प्रकारचा असतो. यामध्ये पानांवर पिवळसर डाग पडून नंतर गोल काळे तपकिरी ठिपके दिसू लागतात. नंतर पाने वाळतात. यासाठी मँकोझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड २५ ग्रॅम किंवा प्रोपिनेब १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून दोन ते तीन फवारण्या आलटून-पालटून कराव्यात.

विषाणूजन्य रोग विषाणू रोगामध्ये अनेक वेगवेगळे रोग आहेत. परंतु टोमॅटो पिकावर प्रामुख्याने करपा (स्पॉटेड विल्ट व्हायरस) व पर्णगुच्छ (लिफकर्ल व्हायरस) हे प्रमुख विषाणू रोग आढळतात. या रोगांची लागण अगदी रोपवाटिकेमधून सुरुवातीपासून होण्याची शक्यता असते. हे रोग अनुक्रमे फुलकिडे, पांढरी माशी या किडीमुळे प्रसार पावतात. त्यासाठी या किडींचा सुरुवातीपासून बंदोबस्त केल्यास ह्या घातक रोगांचे प्रमाण कमी ठेवता येते. शेतीमध्ये हे रोग आढळल्यास कमी प्रमाणात असतानाच रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. या किडींच्या बंदोबस्तासाठी डायमेथोएट ३० ई.सी. १५ ते २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आठवड्याच्या अंतराने साध्या हातपंपाने फवारण्या कराव्यात. नागअळी – या किडीच्या अळ्या पानांच्या पापुद्र्यात शिरून मधील हिरवा भाग पोखरून खातात. त्यामुळे पांढरी पडतात व पानांच्या अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेवर अनिष्ट परिणाम होतो. यासाठी रोपे लागवड करताना लागण झालेल्या रोपांची कीडग्रस्त पाने काढून टाकावीत. लागवडीनंतर नागअळीचा प्रादुर्भाव दिसू लागताच ४ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. फळ पोखरणारी अळी – ही अळी प्रथम पाने खाते व नंतर हिरवी किंवा पिकलेली फळे पोखरून आत शिरते व गर खाते. या किडीच्या नियंत्रणासाठी २० मि.ली. क्विनॉलफॉस २५ टक्के ईसी किंवा १५ मि.ली. नोव्हॅलीरॉन १० टक्के ईसी किंवा क्लोरॅनट्रॅनीलीप्रोल १८.५ टक्के एस.सी. ३ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून ८ ते १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. हेलिओथीस न्युक्लिअर पॉलिहेड्रोसीस व्हायरस (एच.ए.एन.पी.व्ही.) विषाणू २०० मि.ली. प्रति २०० लिटर पाण्यातून संध्याकाळच्या वेळेस फवारावे.

# फळबाग लागवडीसाठी जमीन अन पुर्वतयारी



आपल्याकडे जमीन कोणत्या प्रकारची आहे, आपल्या जमिनीत फळझाडे येतील का, बारमाही पाण्याची व्यवस्था आपल्याकडे आहे का, आपल्या हवामानात फळझाडे कोणत्या प्रकारची येऊ शकतील, मातीची व पाण्याची तपासणी केली आहे काय, बागेसाठी उत्तम जातीवंत कलमे कोठून उपलब्ध होऊ शकती, जी बाग आपण लावणार आहोत त्यास बाजारपेठ उपलब्ध आहे काय, प्रक्रिया उद्योग आहेत काय, अशा सर्व बाबींचा विचार केल्यानंतरच आपणास कोणती फळझाडे लावायला हवीत याचा विचार करणे महत्वाचे ठरते.

फळबाग म्हणजे ५ ते ६ महिन्याच्या पिकांच्या मशागतीची गोष्ट नसते, तो एक दिर्घकाळ चालणारा व्यवसायाच म्हणायला हरकत नाही. एकदा त्यात पडले की थांबुन चालत नाही. अनेक वर्ष सातत्याने व चिकाटीने बागेचे फलोत्पादन हाती येईपर्यंत कष्ट करावे लागतात. मेहनत घ्यावी लागते घामही गाळावा लागतो. कधी कधी पैसा अपुरा पडतो, पाणी पुरत नाही. भावनेच्या भरात एखादी बाग करावयाची ठरविले जाते आणि मग धाडस निभाविता येत नाही. सगळा पसारा अर्ध्यावर सोडावा लागतो. त्यामुळे केलेल्या कष्टाची पैशाची, अनाठायी नासाडी होते. त्यामुळे फळबाग लागवड करण्यापूर्वी योग्य नियोजनांची नितांत आवश्यकता असते.

फळबागेसाठी जमिनीची निवड : आपली जमीन कोणत्या प्रकारची आहे, हलकी, मध्यम की भारी हे माहिति नसेल तर माहिती करून घ्यावी. जमिनीची खोली किती आहे? जमिनीच्या खाली मुरूम किती खोलीवर आहे? जमिनीचा निचरा कसा आहे? त्याचा अभ्यास करूनच फळबाग निवडावी. फळबागेसाठी जमिनीची निवड करताना तिचा निचरा उत्तम असणे आवश्यक आहे. फळबागेसाठी कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमिन निवडावी. भरपूर सेंद्रिय कर्ब असणारी, भुसभुशीत, मध्यम पोताची जमिनीचा सामू ६ ते ७.५ पर्यंत असावा. मुक्त चुनखडीचे प्रमाण १० टक्क्यापेक्षा कमी असावे. जमिनीचा उतार २ ते ३ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. ज्या ठिकाणी फळबाग लावायची आहे, त्या ठिकाणच्या मातीचे परिक्षण करून घेणे आवश्यक आहे.

फळबागेची आखणी आणि अंतर : फळझाडांची आणि जागेची निवड झाल्यावर लागवडीसाठी आखणी करणे गरजेचे आहे, तेंव्हा जमिनीची आखणी करण्यापूर्वी लागवडीची पद्धत ठरवावी. फळपिके लागवडीच्या चौरस, आयताकृती, त्रिकोणी, षटकोनी, उतार (कंटूर) अशा निरनिराळ्या पद्धती आहेत. चौरस पद्धत ही सर्वात सोपी, आखणीस अडचण नसणारी आणि उभ्या-आडव्या मशागतीस योग्य अशी पद्धत प्रामुख्याने सर्वत्र वापरली जाते, आंबा, पेरू, चिकू, संत्रा, मोसंबी इत्यादी फळझाडांची लागवड या पद्धतीने केली जाते. या पद्धतीमध्ये झाडांच्या रांगा काटकोन करून असतात. दोन झाडातील आणि दोन रोपातील अंतर सारखेच येत असल्यामुळे झाडे सर्व दिशांनी पाहिल्यास सारख्या अंतरावर दिसतात. या पद्धतीने लागवड करणे अत्यंत सुलभ असते.

फळबाग लागवडीचे अंतर : विविध फळझाडांसाठी खड्डा खोदणे आणि भरणे महत्वाचे, त्याकरिता खड्ड्याचा आकार किती असावा ? हे खड्डे केंव्हा घ्यावेत? आणि केंव्हा भरावेत आणि कसे ? जेथे फळझाडांची लागवड करावयाची आहे,तेथे योग्य त्या अंतरावर चौरस पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत.जमिनीच्या मगदुराप्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्ड्याचा आकार ठरवावा. खड्डे खोदण्याचे काम उशिरात उशिरा एप्रिल महिन्यात पूर्ण करावे.सर्व साधारणपणे मोठ्या आकाराचे खड्डे हलक्या जमिनीत व मोठया विस्ताराच्या झाडासाठी घ्यावेत. दीर्घायुषी झाडे असतील तर १ बाय १ बाय १ मी. आकाराचा खड्डा घ्यावा. मध्यम आकारच्या झाडांना ७५ बाय ७५ बाय ७५ से. मी. व लहान झाडांना ६० बाय ६० बाय ६० से.मी आकारचे खड्डे घ्यावेत. जमीन डोंगर उतारची असेल तर समपातळी रेषा काढून त्याप्रमाणे लागवड करावी.

फळबागेसाठी खड्डा कसा भराल? : खड्डा खोदताना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी. खड्डे तीन आठवडे तापू द्यावे जेणेकरून प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्याचे निर्जंतुकीकरण होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे परत भरावे. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५ से.मी. थरात भरावा. मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत + २ ते ३ किलो गांडूळखत + २ ते ३ किलो लिंबोळी पेंड २५ ग्रॅम टायकोडर्मा जीवाणू +१५ ग्रॅम स्फुरद विरघळवणारे जीवाणू +२५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅकटर हे मिश्रण मिसळून घ्यावे. खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ से.मी उंच भरून ठेवावा.म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवाती बरोबर लागवड करता येईल. फळबाग लागवडीची योग्य वेळ : खात्रीशीर पाऊस झाल्यावर पावसाच्या सुरुवातीस जून महिना अगर जुलै महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात लागवड करावी. अतिपावसात अगर पावसाच्या शेवटी सप्टेबर-ऑक्टोबर मध्ये फळझाड लागवड करू नये. पावसाच्या सुरुवातीस लागवड केलेली झाडे चांगली समाधानकारक वाढतात. काही कालावधीकरिता पाण्याचा ताणही सहन करू शकतात. जून-जुलै पर्यंत वेळेवर झाडांची लागवड झाल्यास वाढ जोमाने होते. फळझाडांच्या लागवडीसाठी योग्य आकाराचा खड्डा, योग्य अंतरावर एप्रिल-मे महिन्यातच खोदावेत. उन्हाळ्यात खड्डे तापू द्यावेत. खड्डा भरताना तळाला पालापाचोळा टाकून १५ ते २० किलो चांगले कुजलेले शेणखत व पोयटा माती व १ ते १.५ किलो सिंगल सुपर फॉसपेट व ५०-१०० ग्रॅम फॉलीडॉल पावडर यांच्या मिश्रणाने मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यात अथवा जून च्या पहिल्या आठवड्यात भरून घ्यावा. दोन चांगले पाऊस पडून गेल्यावर सर्वसाधारणपणे जून- जुलै महिन्यात रोपांची/कलमांची लागवड करावी. रोपे/कलमे खात्रीशीर रोपवाटिकेतूनच खरेदी करावीत.

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत

# मत्स्योदरी महाविद्यालयात परिक्षा केंद्राची मुख्याधिकारी यांनी केली पाहणी

## चार केंद्रावर २३३३ परीक्षार्थींची उपस्थिती, ३४ विद्यार्थ्यांची दांडी

अंबड । प्रतिनिधी

बारावी बोर्डाच्या लेखी परिक्षेला मंगळार (ता.१०) पासुन प्रारंभ झाला आहे.अंबड शहरातील मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,पारनेर आदर्श इंटरनॅशनल इंग्लीश स्कूल हि दोन तर तालुक्यातील रोहिलगड येथील जांबुवंत विद्यालय, जामखेड येथील आदर्श महाविद्यालय या चार परिक्षा केंद्रावर २३६७ परिक्षार्थी प्रविष्ट होते. त्यापैकी २३३३ परीक्षार्थींनी परिक्षा दिली आहे.तर ३४ विद्यार्थ्यांनी परिक्षेला दांडी मारली आहे.



शहरामधील मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय या परीक्षा परिक्षा केंद्रावर भरारी पथकातील अंबड नगर परिषद चे मुख्य अधिकारी मनोज उकिर्डे यांनी भेट देऊन परीक्षा केंद्राची केली पाहणी यावेळी केंद्र संचालक प्रा. श्री पांडुरंग काळे हे होते. तसेच प्राचार्य डॉ.मिलिंद पंडित यांचे मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख प्रा.पांडुरंग काळे तर त्यांना सहाय्यक म्हणुन प्रा. रविंद्र तिकांडे, प्रा. राजू पठाडे, प्रा.अमोल अकोलकर हे काम पाहत आहेत.मत्स्योदरी महाविद्यालय या परिक्षा केंद्रावर पहिल्याच दिवशी एकूण ३५ हॉल मध्ये ८७१ परिक्षार्थी यांचा समावेश होता.त्यापैकी ८४४ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली तर २७ विद्यार्थ्यांनी दांडी मारली आहे. मंगळवारी (ता.१०) इंग्रजी या भाषा विषयाचा पेपर सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत इंग्रजी भाषा विषयाचा पेपर होता.पेपर संपल्यानंतर विद्यार्थ्यांना बोर्डाने दहा मिनिटे वाढवून दिले आहे.अंबडला बारावी बोर्ड परिक्षा शांततामय वातावरणात सुरू आहे. पोलिसांचा चोख बंदोबस्त बारावी बोर्ड परिक्षा शांततामय वातावरणात घेण्यासाठी तसेच परिक्षा केंद्रांवर गोंधळ होऊ नये.म्हणुन अंबडचे उपविभागीय पोलीस अधिकारी सिध्देश्वर धुमाळ व पोलिस निरीक्षक संतोष घोडके यांचे मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त परिक्षा केंद्रावर तैनात करण्यात आला आहे. शहरातील मत्स्योदरी महाविद्यालय या परिक्षा केंद्राला भरारी पथकांतील प्रमूख नगर पालिकेचे मुख्याधिकारी मनोज उकिरडे व त्यांचे सहकारी जाधव यांनी भेट देऊन पाहणी करत माहिती जाणून घेतली. बारावी परीक्षा केंद्रासाठी परीक्षक म्हणुन शिक्षण विस्तराधिकरी दिनेश बाबा पारदेसह आदी कस्तडियनचे कामकाज पाहत आहे.बारावी बोर्ड परिक्षेला मंगळवार पासुन प्रारंभ होत आहे.परिक्षा शांततामय व कॉपीमुक्त घेण्यासाठी मत्स्योदरी महाविद्यालय नेहमीच तत्पर आहे. परिक्षा हॉलमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्थासह आदी सुविधा परिक्षार्थीसाठी परिक्षा केंद्रावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अशी माहिती प्राचार्डॉ.मिलिंद पंडित यांनी दिली आहे.

## अंबड येथील रोजगार मेळाव्यात ४४ उमेदवारांची निवड



जालना । प्रतिनिधी

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना आणि महर्षी कणाद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अंबड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा' शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यामध्ये विविध नामांकित कंपन्यांनी १९५ उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या त्यापैकी ४४ पात्र उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन महर्षी कणाद शासकीय आयटीआयचे प्राचार्य अतुल केसकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहाय्यक आयुक्त गणेश चिमणकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कौशल्य विकास मार्गदर्शन अधिकारी भुजंग रिठे यांनी केले. गणेश चिमणकर म्हणाले की, शिक्षणाचे मुख्य ध्येय रोजगार किंवा स्वयंरोजगार मिळवणे हेच असायला हवे. शासनाने उपलब्ध करून दिलेल्या या प्लॅटफॉर्मचा तरुणांनी लाभ घ्यावा. तसेच, निवडीनंतर शासनाच्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत शैक्षणिक पात्रतेनुसार ६ ते १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतनही दिले जाते, त्याचाही युवकांनी लाभ घ्यावा. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल परिहार यांनी केले, तर कैलास काळे यांनी आभार मानले. मेळावा यशस्वी करण्यासाठी कौशल्य व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी अमोल बोरकर, नितीन लोकडे, योगेश बहूरे, विशाल जगरवाल, गणेश सुपारकर यांच्यासह कौशल्य विकास विभाग व आयटीआय अंबड येथील सर्व अधिकारी व कर्मचारी होते

# गुरूंच्या आशीर्वादामुळेच मी मंत्रीपदापर्यंत पोहोचलो-शिरसाट



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

''मी गेल्या २० ते २५ वर्षांपासून आचार्य श्री कुंथुसागरजी महाराज व आचार्य श्री देवनंदिजी महाराज यांचा अनन्य भक्त आहे. त्यांच्या आशीर्वादामुळेच मला जीवनात यश मिळत गेले आणि मी आज मंत्रीपदापर्यंत पोहोचू शकलो. परमेश्वराची आणि गुरूंची भक्ती केल्यास जीवनात नक्कीच आनंद आणि यश प्राप्त होते,'' असे प्रतिपादन राज्याचे मंत्री ना. संजय शिरसाट यांनी केले. मालसाणे (चांदवड) येथील णमोकार तीर्थ येथे सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सवास त्यांनी सदिच्छा भेट दिली, त्याप्रसंगी आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पुढे सांगितले की, ''गुरुदेवांचे आशीर्वाद असेच कायम मिळत राहो, शेवटच्या क्षणापर्यंत मी गुरूंची सेवा करीत राहील.'' तत्पूर्वी, ना. शिरसाट यांनी णमोकार तीर्थावरील गुरु मंदिर, समवशरण मंदिर आणि पंचपरमेष्ठी मंदिरात जाऊन मनोभावे दर्शन घेतले.

आज, बुधवार दिनांक ११ फेब्रुवारी रोजी महोत्सवाचा 'ज्ञानकल्याणक' (पूर्वार्ध) सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. सकाळी भगवान श्री चंद्रप्रभूजी स्वामींचा 'आहार विधी' सोहळा राजा सोमदत्त यांच्या घरी संपन्न झाला. यावेळी तपसंस्कार, मंत्रन्यास आणि प्रतिष्ठा हवन विधी पार पडले. तसेच, 'भारतवर्षीय श्री दिगंबर जैन ग्लोबल महासभा' यांचे नैमित्तिक अधिवेशन श्री जमनालाल हपावत यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या संपन्न झाले. राष्ट्रीय युवा अध्यक्ष पारस लोहाडे यांनी सूत्रसंचालन केले व सचिव आनंद काला यांनी आभार मानले आचार्य श्री देवनंदिजी महाराज यांच्या शुभहस्ते पंचम पट्टाधिश आचार्य श्री सुविधीसागर महाराज यांनी वेबसाईट द्वारे तयार केलेल्या ११५३० ऑनलाइन ग्रंथाचे जैन ग्रंथाचे लोकार्पण संपन्न झाले.आचार्य श्री कुथुंसागरजी महाराज यांच्या शुभ हस्ते सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्या उपस्थितीत सुरत येथील शैलेश कापडिया व प्रचार प्रसार संयोजक विनोद पाटणी यांनी आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सव निमित्त तयार केलेल्या जैन मित्र विशेष अंकाचे प्रकाशन संपन्न झाले ललित पाटणी,प्रकाश ठोळे, महेंद्र ठोळे, आर. आर.पहाडे ,विनोद लोहाडे ,विपिन कासलीवाल,अमित कासलिवाल भूषण कासलीवाल,अनिल जमगे पवन पाटणी, विजय लोहाडे यांच्या हस्तेपंचकल्याण समितीतर्फे माननीय संजय शिरसाट यांचा सत्कार करण्यात आला जैन बांधवांनी महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन प्रचार प्रसार संयोजक पारस लोहाडे व प्रसिद्धीप्रमुख विनोद पाटणी राजेंद्र अजमेरा यांनी केले आहे.

## सात तास चाललेल्या १४ किमीच्या साई परिक्रमेत अडीच लाखांवर भाविक

शिर्डी । प्रतिनिधी

पहाटेची गार हवा... मंदिर परिसरात दुमदुमणारा ''साईराम'चा जयघोष आणि फुलांनी नटलेला साईंचा रथ अशा भक्तिमय वातावरणात शुक्रवारी शिर्डीत १४ किलोमीटरच्या भव्य साईपरिक्रमा सोहळ्याला उत्साहात सुरूवात झाली. पहाटे ५.३० वाजता खंडोबा मंदिरासमोर सुवर्ण रथातील साईबाबांच्या प्रतिमेची महाआरती करून परिक्रमा सुरू झाली. सात तास ही परिक्रमा चालली.

मागील सहा वर्षांपासून ग्रीन एन फाउंडेशन, साईबाबा संस्थान, शिर्डी ग्रामस्थ, साईभक्त यांच्या संयुक्त विद्यमान दरवर्षी १३ फेब्रुवारीला हा महोत्सव साजरा होतो. यंदा सातव्या वर्षी परिक्रमेने विक्रमी प्रतिसाद मिळवत सुमारे अडीच लाख भाविकांनी पायी सहभाग नोंदवला, तर मागील वर्षी हा आकडा दीड लाख होता. खंडोबा मंदिरापासून सुरू झालेली ही परिक्रमा शिर्डी पोलीस ठाणे, शिव रस्ता, लुटे वस्ती, बिरोबाबन, साकुरी शिव आदी मार्गांवरून पुन्हा मंदिर परिसरात परत येत १४ किमीचा प्रवास सु राज्यासह परराज्यातील १५ ते २० रथ या सोहळ्यात सहभागी झाले. मध्य प्रदेशातील रतलाम येथून सुमारे ५०० भाविक वेशभूषेत शिर्डीत दाखल झाले. शिस्तबद्ध नियोजन आणि सर्व घटकांच्या सहकार्यामुळे हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडल्याचे संयोजक अजित पारख यांनी सांगितले. २ हजार किला रंगीबेरंगी रांगोळी जगभरातील १८ देशांतील १,३७६ भाविकांसह देशभरातील विविध राज्यांमधून सुमारे अडीच लाख साईभक्त परिक्रमेत सहभागी झाले होते. शिर्डीत ५ हजार किलो विविधरंगी फुलांचा सडा टाकला होता. तर २ हजार किलो रंगीबेरंगी रांगोळी रस्त्यांवर सजवण्यात आली.

# महाशिवरात्री निमित्त भगरीच्या सेवनाबाबत नागरिकांनी घ्यावी काळजी

## अन्न व औषध प्रशासन विभागाचे आवाहन

हिंगोली । प्रतिनिधी

महाशिवरात्री निमित्ताने रविवारी ता १५ मोठ्या प्रमाणात भाविक उपवास करतात. उपवासाच्या दिवशी भगरीचे विविध पदार्थ सेवन करण्याची प्रथा आहे. तथापि, भगर खाल्ल्यामुळे अन्न विषबाधा झाल्याच्या घटना राज्यात वारंवार घडत असल्याने नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत करण्यात आले आहे.

भगर हा भरड धान्याचा एक प्रकार असून वरई, सावा, बर्टी व कोद्रा या धान्यांपासून ती तयार केली जाते. धान्याच्या प्रकारानुसार वरई भगर, सावा भगर, बर्टी भगर व कोद्रा भगर असे प्रकार पडतात. वरई भगर उच्च प्रतीची तर कोद्रा भगर तुलनेने हलक्या प्रतीची समजली जाते. भगरीत कार्बोहायड्रेट्स, डायटरी फायबर्स तसेच कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम यांसारखी खनिजे आढळतात. तिचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने मधुमेही रुग्णांसाठीही ती उपयुक्त मानली जाते. अन्न व औषध प्रशासनाच्या अभ्यासानुसार, भगरीवर बुरशीचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामधून मायकोटॉक्सिन्स तयार होण्याची शक्यता असते. २५ ते ३२ अंश सेल्सिअस तापमान व आर्द्रता बुरशी वाढीस अनुकूल ठरते. अशा प्रकारे बाधित भगर सेवन केल्यास अन्न विषबाधा होऊ शकते. शक्यतो पॅकबंद व नामांकित ब्रँडची भगर खरेदी करावी. पाकीटावरील पॅकिंग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासावा. सूटी अथवा लेबल नसलेली भगर खरेदी करू नये. भगर स्वच्छ, कोरड्या व हवाबंद डब्यात साठवावी. जास्त दिवस साठवलेली भगर वापरू नये. भगरीचे पीठ तयार स्वरूपात खरेदी करण्याऐवजी आवश्यक तेवढीच भगर दळून घ्यावी. पिठात ओलावा शोषण्याची क्षमता जास्त असल्याने बुरशी वाढण्याची शक्यता असते. शक्यतो घरीच दळून ताजे पीठ वापरावे. जाड कोद्रा भगर टाळावी. सलग उपवासाच्या काळात भगर व शेंगदाणे यांसारखे प्रथिनयुक्त पदार्थ मर्यादित प्रमाणात घ्यावेत, अन्यथा ॲसिडिटी, उलटी, मळमळ व पोटदुखीचा त्रास होऊ शकतो. पॅकबंद भगरीचीच विक्री करावी व घाऊक खरेदीची पावती जतन करावी. पॅकेट, पोत्यावर उत्पादकाचा पत्ता, परवाना क्रमांक, पॅकिंग दिनांक व अंतिम वापर दिनांक नमूद असल्याची खात्री करावी. मुदतबाह्य भगर अथवा भगर पिठाची विक्री करू नये. सूटी किंवा खुले भगर व भगर पीठ विक्रीसाठी ठेवू नये. महाशिवरात्री निमित्त उपवास करताना भगरीचे सेवन सुरक्षित पद्धतीने करावे व वरील सूचना पाळून संभाव्य अन्न विषबाधा टाळावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय महामार्ग ६१ भिंगार मध्ये उड्डाण पुल उभारणीची खा. नीलेश लंके यांची मागणी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील भिंगार शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वरील तीव्र वाहतूक कोंडी आणि त्यामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या गंभीर समस्यांकडे खासदार नीलेश लंके यांनी संसदेत लक्ष वेधले. या महामार्गावरील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. खा. लंके यांनी सांगितले की, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या महत्त्वाच्या व्यापारी व औद्योगिक शहरांना जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ६१ हा अत्यंत वर्दळीचा मार्ग आहे. मात्र, भिंगार शहरातून जाताना या महामार्गावर सध्या दिवसभर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. विशेषतः भिंगार सिग्नल चौक आणि भिंगार अर्बन बँक चौक या ठिकाणी जड व सातत्याने होणाऱ्या वाहतुकीमुळे वारंवार वाहतूक ठप्प होत असल्याचे त्यांनी संसदेत नमूद केले.

हा महामार्ग भिंगार कॅन्टोन्मेंट क्षेत्र, बँका, शाळा तसेच दाट लोकवस्तीच्या भागातून जात असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. वाहतुकीच्या या विस्कळीत अवस्थेमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून पादचारी व दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. चौकांमध्ये बसवण्यात आलेले दुभाजक आणि इतर तात्पुरते उपाय सध्या अपुरे ठरत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित करण्यासाठी कायमस्वरूपी व ठोस उपाययोजना आवश्यक असल्यावर भर देत, खा. नीलेश लंके यांनी रस्ते व महामार्ग मंत्र्यांना भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरणाला भिंगार शहरातील या संवेदनशील भागाचे तातडीने सखोल सर्वेक्षण करण्याचे निर्देश देण्याची विनंती केली. तसेच नागरिकांची सुरक्षा आणि वाहतुकीची सुलभता सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग ६१ वर भिंगार शहरातून अत्याधुनिक उड्डाण पुलाच्या बांधकामास प्राधान्याने मंजुरी देण्यात यावी, अशी ठोस मागणी त्यांनी संसदेत केली.

## परभणी महापौरपदी उद्धवसेनेचे सय्यद इक्बाल

परभणी । प्रतिनिधी

शिवसेनेच्या इतिहासात पहिल्यांदाच परभणीत मुस्लिम महापौर देण्यात आला. उद्धवसेनेतर्फे गुरुवारी सय्यद इक्बाल ख्वाजा ३९ मते घेऊन महापौर झाले. त्यांनी भाजपच्या तिरुमला खिल्लारे यांचा १३ मतांनी पराभव केला. महायुतीत सहभागी असूनही राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या अक्षय देशमुख, रजिया बेगम यांनी भाजपला महापौरपदासाठी मतदान करण्यास साफ इन्कार केला. उपमहापौरपदी काँग्रेसचे गणेश देशमुख विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नज्मा अब्दुल रहीम यांचा १० मतांनी पराभव केला.

उपमहापौर निवडणुकीत अक्षय देशमुख तटस्थ राहिले. मराठवाड्यात पाऊल ठेवल्यापासून म्हणजे गेल्या ४० वर्षांतील सर्व निवडणुकीत परभणीमध्ये 'बाण हवा की खान' या मुद्द्यावर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंची शिवसेना विजयी होत होती. २०२४, २५ च्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत पहिल्यांदा हा मुद्दा बाजूला ठेवण्यात आला. त्याचा उद्धवसेनेला लाभ झाला होता. आता सय्यद इक्बाल यांच्या निवडीने उद्धवसेनेने पुढील निवडणुकांसाठी मुस्लिम मतदान पक्के केल्याचे म्हटले जात आहे.

# संभाजीनगरमध्ये पहिलं अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य संस्कृती संमेलन

## दोन दिवस देशभरातील तज्ज्ञांचा सहभाग; वैद्यक, साहित्य आणि संस्कृतीचा अनोखा संगम

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

संभाजीनगरमध्ये आज एक वेगळंच चित्र पाहायला मिळाले. रोज रुग्णसेवा करणारे डॉक्टर आज स्टेथोस्कोपपेक्षा लेखणी, कविता आणि विचारांमधून व्यक्त होताना दिसले. पांढऱ्या कोटामागे दडलेला कवी, लेखक आणि संवेदनशील माणूस आज समोर येताना पाहायला मिळाला. छत्रपती संभाजीनगर येथे पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य संस्कृती संमेलनाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली असून, या संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळला. आय.एम.ए. छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आयोजित या दोन दिवसीय संमेलनात देशभरातून डॉक्टर, साहित्यिक, कवी, लेखक, विचारवंत आणि वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले आहेत. या संमेलनाच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा, साहित्य आणि संस्कृती यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

पहिल्या दिवशी कथा, कविता, गझल, लेखन, वैद्यकीय अनुभवकथन आणि मुक्त संवाद अशा विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले. या सत्रांमधून डॉक्टरांमधील कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून, संमेलनस्थळी विचारांची देवाणघेवाण, चर्चांचा उत्साह आणि साहित्यिक वातावरण पाहायला मिळाले.

संभाजीनगर शहरात अशा प्रकारचं अखिल भारतीय संमेलन होत आहे, याचा मला अतिशय आनंद आहे. डॉक्टरी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीमध्ये केवळ उपचार करणारा तज्ज्ञ नसून, त्याच्यामध्ये कवी, गझलकार आणि लेखकही दडलेला असतो. आज या संमेलनाच्या माध्यमातून डॉक्टरांमधील तो साहित्यिक आणि संवेदनशील चेहरा पाहायला मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे समाजाला सकारात्मक दिशा मिळते. या उत्कृष्ट आयोजनासाठी सर्व डॉक्टरांचे मी मनापासून अभिनंदन करतो. आयएमएच्या वतीने पहिल्यांदाच अशा स्वरूपाचं अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य संस्कृती संमेलन आम्ही आयोजित केलं आहे. या संमेलनाच्या माध्यमातून डॉक्टरांमधील साहित्यिक, कवी आणि लेखकांना स्वतःची अभिव्यक्ती मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आलं आहे. या कार्यक्रमात वैद्यकीय आणि साहित्य क्षेत्रातील नऊ मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. या अनोख्या संमेलनाला संभाजीनगरवासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावं, असं आवाहन मी करतो. या साहित्य संमेलनामुळे डॉक्टरांच्या कलागुणांना मोकळा वाव मिळणार आहे. लिहिणाऱ्या साहित्यिक डॉक्टरांना आपले विचार, अनुभव आणि लेखन समाजासमोर मांडण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळेल. अशा उपक्रमांमुळे वैद्यकीय क्षेत्रातील सर्जनशीलता अधिक खुलते आणि साहित्यिक चळवळीला बळ मिळते.

## २२ फेब्रुवारी रोजी भव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

जालना । प्रतिनिधी

२२ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य दिव्य राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा दुपारी २.०० ते सायं. ६.०० या वेळेत पार पडणार आहे. सदर मेळाव्याचे आयोजन डोंगरदेव वधू-वर सूचक केंद्र यांच्या वतीने करण्यात आले असून, स्थळ आहे. मराठवाडा महसूल प्रबोधिनी प्रशिक्षण केंद्र, शासकीय दूध डेअरी जवळ, सामाजिक न्याय भवन, बंजारा चौक, छत्रपती संभाजीनगर. संस्थेच्या माहितीनुसार, डोंगरदेव वधू-वर सूचक केंद्राने आजपर्यंत तब्बल १४,७७१ विवाह जुळवून दिले असून, हजारो कुटुंबांना संसाराच्या नव्या वाटेवर मार्गदर्शन केले आहे. या यशस्वी परंपरेचा लाभ अधिकाधिक युवक-युवती आणि पालकांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल डोंगरदिवे यांनी केले आहे. या राज्यस्तरीय मेळाव्यात विविध जिल्ह्यांतील इच्छुक वधू-वर व त्यांच्या पालकांना प्रत्यक्ष भेट, संवाद आणि माहिती देवाण-घेवाण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सुव्यवस्थित नोंदणी प्रक्रिया, स्वतंत्र कक्ष व्यवस्था आणि मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.इच्छुकांनी वेळेत उपस्थित राहून या राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रुग्णसेवेचा बोजवारा

## २२ उपकेंद्रे इमारतीविना! मोडकळीस आलेल्या उपकेंद्रांची तातडीने दुरुस्ती करा-डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी सुरू करण्यात आलेली उपकेंद्रे आज स्वत:च अडचणीत सापडली आहेत. माता-बाल संगोपन, लसीकरण, गर्भवतींची तपासणी, साथीचे रोग प्रतिबंधक उपाय आणि प्राथमिक उपचार देणारी अनेक उपकेंद्रे आज भाड्याच्या खोल्यांत, अंगणवाड्यांत किंवा ग्रामपंचायतीच्या जीर्ण इमारतींत चालत आहेत. काही ठिकाणी इमारती नसल्याने तर काही ठिकाणी मोडकळीस आलेल्या अवस्थेत सेवा दिली जात असल्याने रुग्ण व कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात आला आहे.**

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदन देऊन २२ उपकेंद्रांना तातडीने इमारत निधी देण्याची व जीर्ण उपकेंद्रांची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

५४ प्राथमिक आरोग्य केंद्रे; ३०० हून अधिक उपकेंद्रे

बीड जिल्हा येथे एकूण ५४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३०० हून अधिक उपकेंद्रे आहेत. त्यापैकी २२ उपकेंद्रांना ग्रामपंचायतीकडून जागाच उपलब्ध नसल्याने इमारत बांधकाम होऊ शकलेले नाही.

२२ उपकेंद्रे इमारतीविना




ज्या ठिकाणी रुग्णांना उपचार मिळणे अपेक्षित आहे, त्या ठिकाणी इमारतीच नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. खालील ठिकाणी उपकेंद्रांना जागा व इमारत उपलब्ध नाही:

बीड तालुका पेंडगाव, ईट, नेकनूर, मांजरसुंभा

गेवराई आगर नांदूर, चोपड्याची वाडी, भेंड टाकळी, तळवट बोरगाव, हिवरवाडी, आहेर वडगाव

आष्टी पिंपळगाव घाट, जोगेश्वरी पारगाव

धारूर धारूर ग्रामीण

माजलगाव भाटवडगाव, माजलगाव

अंबेजोगाई जोगाईवाडी, शेपवाडी

परळी संगम, पाटोदा पिंपळवाडी

शिरूर कासार कान्होबाची वाडी

बोरखेड उपकेंद्राची जिर्णावस्था

बीड तालुक्यातील बालाघाटावरील बोरखेड येथील उपकेंद्र सुमारे ४० वर्षे जुने असून सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत आहे. सीएचओ, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविका जीव मुठीत धरून दोन गावे व दहा वस्त्यांवरील ग्रामस्थांना सेवा देत आहेत. मागील तीन वर्षांपासून पाठपुरावा करूनही दखल न घेतल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तातडीने दुरुस्ती किंवा नव्या इमारतीसाठी निधी देण्याची मागणी सरपंच सुनिल अनपट व ग्रामस्थांनी केली आहे.

कर्मचारी व व्यवस्थापनातील अडचणी

काही ठिकाणी कर्मचारी नियुक्त असूनही उपकेंद्रांना कुलूप लागल्याचे दिसून येते. इमारत नसल्याचे कारण पुढे करून सेवा खंडित ठेवली जात असल्याने गोरगरिब रुग्णांना खासगी दवाखान्यांचा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची ही दुरवस्था तातडीने दूर करून सर्व उपकेंद्रांना स्वतंत्र, सुरक्षित इमारती उपलब्ध करून द्याव्यात, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला आहे.

# पत्नी बेपत्ता झाल्याची खोटी माहिती दिली हेळंबचा गोविंद भारती पोलिसांच्या ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

**आपली पत्नी बेपत्ता झाल्याची बातमी दूरध्वनी वरून पोलिसांना दिली. याची तपासणी केल्यानंतर पोलिसांच्या हा इसम मद्यपान केलेला आहे, दारूच्या नशेत त्याने खोटी माहिती दिली हे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्यावर गुन्हा दाखल केला.**

पो.कॉ.१८७९ महादेव बबन केदार नेमणुक पोलीस ठाणे परळी ग्रामीण यांनी दि.१२/०२/२०२६ रोजी सरकारतर्फे फिर्यादी होऊन पो.स्टे.ला फिर्याद दिली की, ते दिनांक १२/०२/२०२६ रोजी ०८:०० ते २०:०० वा. पावेतो डायल ११२ या आपत्कालीन सुविधीकरिता कर्तव्यावर असताना वर मो.क्र.९३७३२२५०७१ वरुन कॉल आला व त्यात गोविंद गजेंद्र भारती रा. हेळंब ता. परळी वै जिल्हा बीड याने त्याची पत्नी रोहीणी ही बेपत्ता झाली आहे .अशी माहिती दिली होती म्हणुन त्यावेळी सोबत पोकॉ ७६२ तुळशिराम मानेजी परतवाड यांचेसह हेंळंब येथे जाऊन नमुद ईसमाची भेट घेतली असता नमुद ईसम दारु पिलेला आढळुन आला. त्याने दिलेल्या माहितीची त्यांनी खात्री केली असता नमुद इसमच्या दारु पिण्याच्या सवईला कंटाळुन त्याची पत्नी ही तिच्या माहेरी राहत असल्याची माहिती त्यांना प्राप्त झाली. तसेच त्याची पत्नी माहेरी असल्याचे गोविंद भारती यास माहित असल्याची त्यांची खात्री झाली. तसेच दि.११/०२/२०२६ रोजी देखील नमुद कॉलरने डायल ११२ या आपत्कालीन सुविधेवर संपर्क करुन त्याची पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती व पोह १५३४ पी.व्ही.वाले यांनी नमुद कॉलरची पत्नी बेपत्ता झाली नसल्याची खात्री करुन कॉलर यास खोट्या माहितीचे कॉल न करण्याची तोंडी समज दिली होती. नमुद ईसमास पोकॉ केदार व पोकॉ परतवाड यांनी ताब्यात घेऊन तो दारुच्या अंमलाखाली आहे किंवा कसे याबाबत त्याची उपजिल्हा रुग्णालय परळी वै येथे वैद्यकिय तपासणी केली आहे.

शासनाने डायल पान ३ वर

# शरिराला जपा, व्यसनापासून दूर रहा -सुनिल महाराज काळे

**बीड । प्रतिनिधी**

**माणसाच्या जीवनात शरीर, बुद्धी, सत्ता आणि आर्थिक स्थिती या चारही गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी त्यामध्ये सर्वात महत्त्वाचे स्थान शरीराला आहे. शरीर सुदृढ असेल तरच बुद्धी सक्षम राहते, बुद्धी सक्षम असेल तरच व्यक्ती प्रगतीच्या वाटेवर आगेकूच करु शकते. मात्र व्यसनाधीनतेमुळे आजच्या तरुण पिढीचे आरोग्य धोक्यात आले असून लाखमोलाचे शरीर व्यसनामुळे वाया घालवू नका, चांगले जीवन जगा, असा मौलिक संदेश ह.भ.प. सुनिल महाराज काळे यांनी दिला.**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बीड तालुक्यातील रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात दुसऱ्या दिवशी ह.भ.प. सुनिल महाराज काळे यांनी कीर्तन सेवेतून प्रभावी निरूपण करताना संत तुकाराम महाराज यांच्या बळियाचे अंकित, आम्ही झालों बळिवंत. लाताळीता संसारा, केला षड उर्मीचा मारा..




जन धन तन केलें, तृणाही समान तुका म्हणे आतां, आम्ही मुक्तीचिया माथां.. या अभंगाच्या माध्यमातून त्यांनी आत्मिक बळ प्राप्त करण्याचा संदेश दिला. शरीर, मन आणि धन यांचा योग्य उपयोग केल्यास जीवन अर्थपूर्ण होते, असे त्यांनी सांगितले. व्यसनमुक्ती, सदाचार आणि हरिनामस्मरण यांद्वारे जीवनात खऱ्या अर्थाने समाधान प्राप्त होते, असेही ते म्हणाले. यावेळी शिवाजी महाराज नेवडे, आण्णा महाराज शेळके, निर्गुण महाराज गवंडे, परमेश्वर महाराज माने, रावसाहेब महाराज मेखले, साहेबराव महाराज नेहराळे, मृदुंगाचार्य रमेश महाराज पिसाळ, आकाश महाराज मस्के, साहेबराव महाराज पिसाळ, रामनाथ महाराज चव्हाण, तसेच विद्यानेश्वर वारकरी संस्थेतील छोटे वारकरी, ग्रामस्थ आणि पंचक्रोशीतील भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखंड हरिनाम सप्ताहामुळे रामनगर परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. पान ३ वर

# गोवंश मास विक्री करणाऱ्या विरूध्द तीन ठिकाणी छापे

## दोन आरोपी ताब्यात; ६० हजाराचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

गोवंश मास विक्री होत असल्याची माहिती गेवराई पोलिसांना मिळाल्यावरून त्यांनी गेवराई शहरात तीन ठिकाणी छापे मारून दोघांना अटक करून ६०००० रू.चा माल जप्त केला.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे दिलेल्या आदेशानुसार दिनांक १४.०२.२०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीवरून गेवराई पोलीसांनी वेगवेगळी तीन पथक तयार करून सकाळी ०८.३० वा. गेवराई शहरातील खाटीक गल्ली गेवराई येथे वेगवेगळ्या तीन ठिकाणी छापा मारून १) आयान खलील शेख, रा. खाटीक गल्ली, गेवराई, ता.गेवराई, जि. बीड याच्या ताब्यातून १४५ किलो गोमांस व ५८००/-रू चे ईतर साहित्य, २) अख्तर ईस्माईल कुरेशी, रा.खाटीक गल्ली गेवराई यांचे ताब्यातून ६० किलो गोमांस व ३) रफीक कुरेशी, रा. खाटीक गल्ली गेवराई (फरार) याच्या ताब्यातून ६० किलो गोमांस असे एकूण-२ क्विंटल ६५ किलो गोमांस जप्त करून दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गोमांसातून पशु वैद्यकिय अधिकारी, गेवराई यांचेकडून नमुने पान ३ वर

# मोटारसायकल अपघातात खडकी देवळाचा तरुण ठार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी अंमळ रस्त्यावर भरधाव वेगाने येणारा वडवणी तालुक्यातील खडकी देवळा येथील तरुण मोटार सायकल बांधकाम चालू असलेल्या पुलाला धडकल्याने जागीच ठार झाला.

वडवणी तालुक्यातील खडकी देवळा येथील तरुण बीड वरून अंमळनेर मार्गे पुण्याकडे जात असतांना त्यांना धामणगाव कडे जाण्याचे न समजल्याने ते आष्टीच्या दिशेने सरळ भरधाव वेगाने मोटार सायकलवर येत असतांना रस्त्यावर सुरू असलेल्या पूल बांधकामांमध्ये समोर असलेल्या मोठ्या ढिगाऱ्यावर जाऊन आदळले. रात्रीच्या वेळी गाडीची स्पीड व पुलाचे अर्धवट बांधकाम त्यांना लवकर लक्षात न आल्याने हा अपघात घडला असल्याचे समजते. या अपघातामध्ये एक तरुण जागीच ठार झाला असून दुसऱ्याला उपचारासाठी बीड येथे नेल्याचे पोहेका मुंडे यांनी सांगितले. पोलीस भरतीच्या पहिल्याच दिवशी बीड येथे परळी येथील तरुण मृत्यू पावला त्यानंतर हे तरुण देखील पोस्ट ऑफिस मध्ये भरतीसाठी पुणे येथे जात होते. मात्र पुणे येथे पोहोचण्याचा अगोदर काळाने घाला घातला व त्या दोघातील एकाला मृत्यूला कवटाळावे लागले.

# चेक बाऊन्स प्रकरणी माजलगाव न्यायालयात आरोपीला सहा महिने कारावास, २.८० लाखांचा दंड

माजलगाव । प्रतिनिधी

विहिरीच्या खोदकामाची थकीत रक्कम देण्यासाठी दिलेला चेक हेतुपुरस्सर स्वाक्षरी बदलून अमान्य केल्याप्रकरणी, माजलगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी राहुल पौळ यांनी आरोपीला दोषी ठरवत सहा महिने कारावास आणि २ लाख ८० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.



या प्रकरणाची सविस्तर माहिती अशी की,फुले पिंपळगाव येथील फेमस अर्थमूव्हर्सचे मालक शेख शफीक शेख हसन यांनी मौजे लोणगाव येथील भागवत बाबासाहेब आलाट यांच्या सांगण्यावरून हुंडाई २१० मशीनच्या सहाय्याने विहिरीचे खोदकाम केले होते. या कामाचे २ लाख रुपये थकीत असल्याने आरोपीने फिर्यादीस त्या रकमेचा चेक दिला होता.मात्र,सदर चेक बँकेत वटवण्यासाठी टाकला असता, खातेदाराने आपली स्वाक्षरी जाणीवपूर्वक बदलल्यामुळे तो वटू शकला नाही,असा लेखी मेमो बँकेने दिला. या फसवणुकीबाबत फिर्यादीने ॲड.खलील शेख यांच्यामार्फत कायदेशीर नोटीस पाठवूनही आरोपीने रक्कम अदा केली नाही. शेवटी फिर्यादीने माजलगाव न्यायालयात नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ अन्वये दाद मागितली. खटल्यादरम्यान फिर्यादी पक्षाचे वकील ॲड.खलील शेख यांनी प्रबळ साक्ष-पुरावे आणि पान ३ वर

# भारत स्काऊट्स आणि गाईड्सचा ३३ वा जिल्हा मेळावा उत्साहात संपन्न

बीड । प्रतिनिधी

भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय, बीड यांच्या वतीने आयोजित ३३ वा स्काऊट-गाईड जिल्हा मेळावा स्काऊट भवन येथे दोन दिवस उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. दिनांक १२ गुरुवार रोजी पहिल्या दिवशी भव्य-दिव्य उद्घाटन सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला, तर दुसऱ्या दिवशी विविध स्पर्धांचे निकाल जाहीर करून समारोप समारंभ उत्साहात पार पडला.



मेळाव्याचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा जिल्हा मुख्य आयुक्त डॉ. किरण कुवर मॅडम यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा चिटणीस श्री रंगनाथ राऊत, सहाय्यक जिल्हा आयुक्त तथा ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा जिल्हा आयुक्त स्काऊट श्री नानाभाऊ हजारे, अधीक्षक माध्यमिक श्री अजय बहिर, सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री तुकाराम पवार, राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती द्रोपदी तायडे, विनायक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथा सहाय्यक जिल्हा आयुक्त श्रीमती कीर्ती पांगरकर, यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा सहाय्यक जिल्हा आयुक्त श्री गणेश वाघ तसेच जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा सहाय्यक जिल्हा आयुक्त स्काऊट श्री अभिमन्यू इबिते यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मेळाव्याचे प्रास्ताविक जिल्हा संघटक श्री योगेश आवढाळ यांनी करून दोन दिवसीय कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा मांडली. या मेळाव्यात संचालन स्पर्धा (स्काऊट-गाईड विभाग), साहसी स्पर्धा, चित्रकला व निबंध स्पर्धा, शेकोटी (सांस्कृतिक कार्यक्रम), तंबू निरीक्षण, पान ३ वर

# इंग्लिश स्कूलमधून मुलांना दर्जेदार शिक्षण दिले जाते -डॉ.भाऊसाहेब पुर्भे

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी शहरातील प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलचे,वार्षिक स्नेहसंमेलन सोमवार दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले वडवणी शहरातील नामांकित डॉक्टर वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त एकाच व्यासपीठावर एकत्र आले होते.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार मा.केशवराव आंधळे तर प्रमुख उद्घाटक म्हणून मा.डॉ.भाऊसाहेब पुर्भे तसेच प्रमुख पाहुणे डॉ.गुरुदत्त



महादर,डॉ.शंकर वाघ,डॉ.जगदीश टकले,डॉ.राम बडे,डॉ.अमोल मुंडे,माजी सभापती सौ.सुलोचना आंधळे,उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे,उपसरपंच मयुर बडे,संचालक रणजीत भैय्या धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे,सौ.कोमल संजय आंधळे,सौ.स्मिता अशोक आंधळे (एमएसईबी अभियंता),इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शितल लाटणे यांची मान्यवर म्हणून उपस्थिती लाभली.

मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन,प्रतिमा पूजन करून वार्षिक स्नेहसंमेलनाचे श्रीफळ फोडून उद्घाटन करण्यात आले.मान्यवरांचे इंग्लिश स्कूलच्या वतीने सत्कार करण्यात आला तसेच कार्यक्रमात बेस्ट स्टुडन्ट ऑफ द इयर,शंभर टक्के उपस्थिती,क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळवलेले गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ.भाऊसाहेब पुर्भे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले पान ३ वर

# वाढदिवसाचा अपव्यय खर्च टाळून शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्या -आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आज समाजामध्ये वाढदिवसाच्या अवचित्य साधून अनेक लोक अवहाचा सव्वा खर्च करून वाढदिवस साजरे करतात हे न करता जिल्हा परिषद शाळेमध्ये गोरगरीब विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षण घेतात अशा गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य शाळेचा युनिफॉर्म अथवा आपल्याला जमल त्या पद्धतीने या विद्यार्थ्यांना आपण मदत केली पाहिजे असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी कन्या प्रशाला आष्टी यास प्रशालेमध्ये शनिवारी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे कट्टर समर्थक असलेले गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर परिवंत गायकवाड व त्यांच्या सौभाग्यवती सरपंच वंदना गायकवाड यांनी कन्या प्रशालेतील



विद्यार्थिनींना शाळेचा युनिफॉर्म शैक्षणिक साहित्याचे वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी आमदार धस हे बोलत होतेसमाजातील वंचित, गरजू व होतकरू विद्यार्थिनींच्या शिक्षणासाठी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी समाजसेवा असल्याचा जिवंत आदर्श क-हेवडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते परिवंत गायकवाड यांनी पुन्हा एकदा आपल्या कृतीतून दाखवून दिला. आष्टी, पाटोदा व शिरूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथील पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशालेतील विद्यार्थिनींना गणवेश व शालेय साहित्य वाटपाचा स्तुत्य उपक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता आमदार सुरेश (अण्णा) धस यांच्या हस्ते संपन्न झाला. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनी आर्थिक अडचणींमुळे आवश्यक गणवेश, वह्या, पुस्तके व शैक्षणिक साहित्यापासून वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन परिवंत गायकवाड यांनी स्वतः पुढाकार घेत विद्यार्थिनींना आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले.

शिक्षणासाठी नवे बळ

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा मिळणार असून त्यांच्या शैक्षणिक प्रवासात आत्मविश्वास, प्रेरणा व नवे बळ मिळणार आहे. विद्यार्थिनींचे शिक्षण व सक्षमीकरण हे समाजाच्या पान ३ वर

# आंतरशालेय रंगभरण स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

शहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ, बीड संस्थेचे संस्थापक सचिव शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य आंतरशालेय रंगभरण स्पर्धेचे शनिवार, १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० या वेळेत बीड शहरातील यशवंत विद्यालय व शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय या केंद्रांवर मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आपली कलात्मकता सादर केली.



छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आणि यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन शिक्षण क्षेत्रात संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) वाघ यांच्या जयंती निमित्ताने आंतर शालेय रंगभरन स्पर्धा शिवनेरी शिक्षण प्रसारक पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# चाकणमध्ये पीएमपीएमएलची इलेक्ट्रिक बस पेटली ; ५० प्रवाशांचे प्राण वाचले

चाकण: चाकण औद्योगिक वसाहतीत निघोजे (ता. खेड) हद्दीत शुक्रवारी (दि. १३) सकाळी महिंद्रा कंपनीसमोर प्रवाशांनी भरलेल्या पीएमपीएमएलच्या धावत्या इलेक्ट्रिक बसने अचानक पेट घेतला. बसमध्ये सुमारे ५० प्रवासी होते. सुदैवाने चालकाने प्रसंगावधान राखत बस थांबवून प्रवाशांना तत्काळ खाली उतरविल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.

ही घटना सार्वजनिक वाहतुकीच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली आहे. प्राप्त होत असलेल्या प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचेपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते आणि



काही वेळातच लाखो रुपयांची ही बस जागेवर जळून खाक झाली.

चाकण एमआयडीसी निघोजे-महाळुंगे मार्गावरून पीएमपीएमएल बस (एमएच १२ एसएफ १३८८) शुक्रवारी (दि. १३) सकाळी नेहमीप्रमाणे प्रवाशांना घेऊन जात होती. ही बस ८:४५ वाजेच्या सुमारास महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या समोर आली असता अचानक इंजिनमधून धूर निघू लागला. धुराचे लोट पाहताच चालकाने तातडीने बस थांबवून सर्व प्रवाशांना खाली उतरवले. प्रवासी खाली उतरल्यानंतर काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.

घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांनी आग शमवण्याचा प्रयत्न केला. मात्र, आग आटोक्यात आली नाही. अखेर निघोजे अग्निशमन विभाग आणि आणि महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र, तोपर्यंत संपूर्ण बस आगीत खाक झाली होती. शॉर्ट सर्किटमुळे बसला आग लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. चाकण औद्योगिक भागात कामगार मोठ्या प्रमाणावर अशा बसेस मधून प्रवास करतात. त्यामुळे प्रत्येक फेरीनंतर बसच्या इलेक्ट्रिकल वायरिंगची तपासणी होणे गरजेचे असते. बसमध्ये अग्निशमन उपकरणे सुस्थितीत असावीत आणि चालकांना त्याच्या वापराचे प्रशिक्षण देणे बंधनकारक असते. धूर निघताच अलार्म वाजणारी यंत्रणा असणे अनिवार्य आहे, असे संबंधित घटना टाळण्यासाठी गरजेचे असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

# पुणे महापालिकेत करदुरुस्तीवरून धमकी

पुणे । प्रतिनिधी

मिळकतकराच्या बिलातील दुरुस्तीचे काम होत नसल्याने एका वैतागलेल्या नागरिकाने शुक्रवारी



(दि.१३) थेट पिस्तूल स्वत:च्याच डोक्याला लावून गोळी मारून घेण्याची धमकी अधिकाऱ्याला दिली. मुख्य सभेच्या कामकाजाच्या दिवशीच हा प्रकार घडल्याने महापालिकेत गोंधळ उडाला. या घटनेची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्तांनी संबंधित व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

महापौर व उपमहापौर निवडीनंतर महापालिकेची शुक्रवारी पहिलीच खास सभा होती. त्यामुळे महापालिकेत नगरसेवकांसह कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती. सायंकाळी चार-साडेचारच्या सुमारास जुन्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर मिळकतकर बिलदुरुस्तीसाठी आलेल्या नागरिकाचा कर्मचाऱ्यांसमवेत वाद झाला.

या वादातून संबंधित नागरिकाने स्वत:च्या डोक्याला पिस्तूल लावून घेत गोळी मारून घेण्याची धमकी देण्याचा प्रकार घडला. मात्र, या कार्यालयात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळीच हस्तक्षेप करून संबंधितांची मनधरणी केल्याने पुढील अनर्थ टळला. मात्र, या घटनेने पालिकेत खळबळ उडाली. महापालिका कर्मचाऱ्यांमध्ये घबराट पसरली. त्यांनी सुरक्षा विभागाला ही बाब कळवली. यानंतर पोलिसांत तक्रार देण्यात आली आहे. ज्या नागरिकाने स्वत:च्या डोक्याला पिस्तूल लावून गोळी मारून घेण्याची धमकी दिली तो कोंढव्यातील रहिवासी आहे. त्याची कोंढव्यात कमर्शिअल मिळकत असून, तिचा जवळपास सव्वा दोन कोटींचा कर थकीत आहे. मात्र, हा कर चुकीच्या पद्धतीने लावण्यात आला आहे. त्यामुळे तो दुरुस्त करण्यात यावा, यासाठी तो पाठपुरावा करीत होता. शुक्रवारी अभय योजनेचा शेवटचा दिवस असल्याने बिलात दुरुस्ती करून त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी त्याने हे कृत्य केले असल्याचे सांगण्यात येत आहे.

# मोजणी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांनी परत पाठवले ; ड्रोनच्या माध्यमातून मोजणीचा प्रयत्न हाणून पाडला

सासवड : पुरंदर तालुक्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुरंदर तालुक्यातील विमानतळ प्रकल्प बाधित गावात भूमी अभीलेख आणि महसूल विभागाने शेतकऱ्यांच्या परस्पर ड्रोनच्या माध्यमातून मोजणी करण्याचा प्रयत्न केला होता. याची माहिती शेतकऱ्यांना मिळताच शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने जमून अधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती केली. शेतकऱ्यांनी प्रचंड विरोध केल्याने मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना अक्षरश: पळ काढावा लागला आहे.



पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर, खानवडी, मुंजवडी, कुंभारवळण या सात गावात विमानतळ प्रकल्प करण्यात येत असून, शासनाकडून ९६ टक्के शेतकऱ्यांची समती असल्याचे सांगितले जात आहे. याच आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विमानतळ प्रकल्पाचा आढावा घेतला होता. त्यानंतर लगेच दुसरी बैठक घेवून प्रकल्पाला लागणारा निधी सहा हजार कोटी रुपये उपलब्ध करून देण्याची तरतूद जाहीर केली आहे. दरम्यान गेल्या दोन दिवसापासून शेतकऱ्यांना पुरंदरच्या प्रांताकडून मोजणी झालेल्या शेतकऱ्यांना नोटीस देण्याची कार्यवाही सुरु केली असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड प्रमाणात रोष निर्माण झाला होता. दरम्यान शुक्रवारी सकाळी शेतकऱ्यांना कोणतीही माहिती न देता भूसंपादन विभागाचे अधिकारी यांनी उदाचीवाडी आणि परगावच्या हद्दीत जाऊन ड्रोनच्या माध्यमातून मोजणी करण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांना याबाबत माहिती मिळताच शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने जमा होत संबंधित अधिकाऱ्यांना कडाडून विरोध केला. तसेच आम्हाला विश्वासात न घेता तसेच कोणती ही नोटीस न देता आमच्या जमिनीची परस्पर मोजणी का सुरु केली ? असा जाब विचारला.

# पुण्यात रंगणार उद्योजकतेचा महाकुंभ; 'एमईए इंटरनॅशनल बिझनेस एक्स्पो २०२६' चे भव्य आयोजन

पुणे । प्रतिनिधी

मराठा समाजाला जागतिक उद्योजकीय नकाशावर ठळकपणे अधोरेखित करण्यासाठी, मराठा आंत्रप्रिन्युअर्स असोसिएशन (एमईए) च्या वतीने 'एमईए इंटरनॅशनल बिझनेस एक्स्पो २०२६' चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. एका समाजाने आयोजित केलेले हे भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक प्रदर्शनांपैकी एक ठरणार असून, दि. २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ रोजी पुण्याच्या ग्रीकल्चरल ग्राउंड येथे हे प्रदर्शन पार पडणार आहे.

'एकतेतून समृद्धीकडे' आणि 'मराठा समाज - उद्योजक समाज' या संकल्पनेवर आधारित असलेल्या या एक्स्पोमध्ये देश-विदेशातील मराठा उद्योजक, गुंतवणूकदार आणि स्टार्टअप्स एकाच छताखाली येणार आहेत.

या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात उद्योगांच्या विविध क्षेत्रांचा समावेश असणार आहे. यामध्ये प्रामुख्याने रिअल इस्टेट, मॅन्युफॅक्चरिंग, आयटी, ॲग्रो-टेक, एफएमसीजी, ऑटोमोबाईल, बँकिंग व फायनान्स, हेल्थ, शिक्षण आणि हॉस्पिटॅलिटी यांसारख्या ५०० हून अधिक स्टॉल्सची




मांदियाळी असेल. या प्रदर्शनात आंतरराष्ट्रीय व्यापार संस्था, शासकीय प्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांची उपस्थिती लाभणार असल्याने उद्योजकांसाठी हे एक मोठे व्यासपीठ ठरणार आहे.

हे एक्स्पो केवळ प्रदर्शन नसून ती एक व्यावसायिक चळवळ आहे. यामध्ये सहभागी होणाऱ्या उद्योजकांना जागतिक दर्जाचे नेटवर्किंग, नवीन भागीदारी आणि थेट गुंतवणूकदारांशी संवाद साधण्याची सुवर्णसंधी मिळेल. जागतिक बाजारपेठेत व्यवसाय विस्तार कसा करावा, याचे मार्गदर्शनही तज्ज्ञांकडून दिले जाणार आहे. नवीन कल्पनांना वाव मिळण्यासाठी आणि धोरणात्मक सहकार्य वाढवण्यासाठी हे प्रदर्शन मैलाचा दगड ठरेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

गेल्या दशकभरापासून मराठा उद्योजकांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या 'एमईए'चे आज २,००० पेक्षा अधिक सभासद आहेत. २०० हून अधिक यशस्वी उपक्रम राबवणाऱ्या या संस्थेचा मुख्य उद्देश समाजातील उद्योजकांना जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी सक्षम करणे हा आहे. संघटनेचे अध्यक्ष विक्रम गायकवाड यांनी या ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाला उपस्थित राहून संधी, नवकल्पना आणि सहकार्याचा जागतिक अनुभव घेण्याचे आवाहन केले आहे. महाराष्ट्रातील तमाम नागरिकांनी आणि उद्योगप्रेमींनी या जागतिक अनुभवाचा लाभ घेण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# महापालिका अभय योजनेला पुन्हा मुदतवाढ; आता 'या' तारखेपर्यंत थकबाकी भरता येणार

पुणे : महापालिका प्रशासनाकडून मिळकतकर अभय योजनेस अखेर महिन्याभराची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आता थकबाकीदारांना




१५ मार्चपर्यंत थकबाकी भरता येणार आहे. ही तिसरी मुदतवाढ आहे. महापालिकेच्या मिळकतकराची थकबाकी १३ हजार कोटींच्यावर गेल्याने, तसेच दरवर्षी ही थकबाकी वाढतच असल्याने महापालिकेकडून मूळ थकबाकीवर आकारण्यात आलेल्या दंडाच्या रकमेत या योजनेत ७५ टक्के सूट देण्यात आली होती.

ही योजना सुरुवातीला १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी या कालावधीसाठी प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र, त्यात, प्रशासनास अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने या योजनेस महापालिका आयुक्तांनी या अभय योजनेस १५ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, शुक्रवारी झालेल्या मुख्य सभेत महापालिकेने पुणेकरांवर करवाढ न करता प्रशासनाने अभय योजनेस मुदतवाढ दिल्यास उत्पन्नात वाढ होणार असल्याने मुदतवाढ देण्याची मागणी काँग्रेसचे नगरसेवक अविनाश साळवे, राष्ट्रवादीचे नगरसेवक बाबूराव चांदेरे यांनी सभागृहात केली. दरम्यान, सभागृह नेते गणेश बिडकर यांनी १५ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी आयुक्तांकडे केली असून, प्रशासनाशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले. त्यानंतर महापालिका आयुक्तांनी शुक्रवारी रात्री उशिरा याबाबतचे आदेश काढले आहेत.अभय योजनेअंतर्गत १३ फेब्रुवारीपर्यंत सुमारे १ लाख ३५ हजारांहून अधिक मिळकतधारकांनी या योजनेचा लाभ घेतला असून, तब्बल ८०१ कोटी रुपयांपेक्षा अधिक महसूल महापालिकेला प्राप्त झाला आहे.

# बँकॉक टू पुणे 'गेम' फसला! खेळण्यांच्या बॉक्समधून ५ कोटींचा गांजा जप्त; विमानतळावर मोठी कारवाई

पुणे । प्रतिनिधी

विमानाने बँकॉकहून पुण्यात आलेल्या प्रवाशाने खेळण्यांच्या बॉक्समध्ये लपवलेला तब्बल ५ कोटी ४२ लाखांचा हायड्रोपोनिक गांजा पुणे विमानतळावरील कस्टम (सीमाशुल्क) विभागाने जप्त केला. याप्रकरणी प्रवाशाला अटक केली आहे.परदेशातून देशाच्या विविध भागात प्रवास करणार्या तस्करांकडून वारंवार ड्रग्जची वाहतूक केली जाते. त्यापार्श्वभूमीवर तस्करांना पकडण्यासाठी कस्टमकडून सातत्याने कारवाई केली जाते.



बुधवारी (दि. ११) एअर इंडिया एक्स्प्रेसच्या आयएक्स २४१ विमानातून हा प्रवासी विमानतळावर उतरला होता. त्याच्या हालचाली संशयास्पद दिसल्याने साहित्याची तपासणी केली. त्यावेळी पारदर्शक पाकिटांमध्ये हायड्रोपोनिक गांजा आढळून आला. संबंधित पाकिटे कार्बन पेपरमध्ये गुंडाळून पाच खेळण्यांच्या बॉक्समध्ये गांजा लपवून ठेवला होता. गांजाचे वजन ५ हजार ४२९ ग्रॅम असून त्याची आंतरराष्ट्रीय बाजारात ५ कोटी ४२ लाख एवढी किंमत आहे. याबाबत आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याने गांजा कोठून आणला, तो कोणाला विक्री करणार होता, याचा तपास करण्यात येत आहे. ड्रग्ज रॅकेटमागील इतरांचा शोध घेतला सुरू आहे.

# पुणे वाहतूक पोलिसांचा इशारा ; नियम तोडल्यास थेट दुचाकी जप्त होणार ?

पुणे । प्रतिनिधी

एकाच दुचाकीवरून तिघांचा प्रवास करणाऱ्या 'ट्रिपल सीट'सह अन्य प्रकारचे वाहतूक नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा धडाका कायम ठेवला असून गेल्या दोन दिवसात वाहतूक पोलिसांनी वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्यांच्या ९८८ दुचाकी ताब्यात घेतल्या आहेत. या बेशिस्त दुचाकीस्वारांकडून २१ लाख ३७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.



भरधाव, व बेशिस्त दुचाकीस्वारांमुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडतात. एकाच दुचाकीवरून तिघांचा प्रवास अशा प्रकारचा नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध पोलिसांनी कारवाई तीव्र केली आहे. गेल्या दोन दिवसांत दोन हजार ६४९ दुचाकीस्वारांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली. तर ९८८ दुचाकी ताब्यात घेतल्या.

ताब्यात घेतलेल्या दुचाकी कागदपत्रांची पूर्तता, थकीत दंड भरल्यानंतर ताब्यात देण्याची प्रक्रिया टप्याटप्याने पार पाडण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली. आतापर्यंत विशेष मोहिमेद्वारे वाहतूक पोलिसांनी ट्रिपल सीट, तसेच अन्य प्रकारचे वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून एक कोटी तीन लाख २५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

# वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात सहा आरोपींवर आरोप निश्चित

पुणे । प्रतिनिधी

राज्यभर खळबळ उडवणाऱ्या वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणात महत्त्वाची न्यायालयीन घडामोड घडलीय.वैष्णवी हागवणे हुंडाबळी प्रकरणात सत्र न्यायालयाने सहा आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले आहेत. या आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले असून खटल्याची सुनावणी येत्या २३ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष लागले आहे.






वैष्णवी हगवणे प्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिसांनी १४ जुलै रोजी ११ जणांविरोधात आरोपपत्र दाखल केले आहे.यामध्ये राजेंद्र हगवणे, त्यांची पत्नी, दोन मुलं, एक मुलगी आणि इतर सहा जणांचा समावेश होता. वैष्णवीच्या मृत्यूनंतर ५८ दिवसांनी हे आरोपपत्र दाखल झाले होते. आता सत्र न्यायालयाने सहा आरोपींविरुद्ध आरोप निश्चित केले आहेत. वैष्णवी हगवणे हिचा मृतदेह १६ मे रोजी भुकूम येथील सासरी पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला होता. सुरुवातीला हा आत्महत्येचा प्रकार असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला; मात्र शवविच्छेदन अहवालात तिच्या शरीरावर जखमांच्या खुणा आढळल्याने प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. आत्महत्या की खून याबाबत संशय निर्माण झाला होता. या प्रकारणाने राज्यात मोठी खळबळ उडाली होती. हगवणे कुटुंबाची राजकीय पार्श्वभूमी असल्यानं पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले होते. मग तपासाची सूत्र वेगाने हलू लागली. पोलिसांनी या प्रकरणात वैष्णवीचे पती शशांक हागवणे, सासू लता हागवणे, नणंद करिश्मा हागवणे, सासरे राजेंद्र हागवणे, दीर सुशील हागवणे आणि कुटुंबीय मित्र निलेश चव्हाण यांना अटक केली. हगवणे कुटुंबाची राजकीय पार्श्वभूमी असल्याने पोलिसांच्या तपासावरही टीका झाली होती. विशेष म्हणजे निलेश चव्हाण याच्यावर वैष्णवीच्या अल्पवयीन मुलाला बेकायदेशीर ताब्यात ठेवून धमकावल्याचा अतिरिक्त आरोपही ठेवण्यात आला आहे. १७ मे रोजी वैष्णवीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर जुलै महिन्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सविस्तर आरोपपत्र न्यायालयात दाखल केले. तपासाचा वेग वाढवत पोलिसांनी या प्रकरणात वैष्णवीचा पती शशांक हगवणे, सासू लता हगवणे, नणंद करिश्मा हगवणे, सासरे राजेंद्र हगवणे, दीर सुशील हगवणे आणि कुटुंबीय मित्र निलेश चव्हाण यांना अटक केली. या सर्वांवर हुंडाबळी, आत्महत्येस प्रवृत्त करणे, छळ व मारहाण, गुन्हेगारी कट रचणे तसेच पुरावे नष्ट करण्याचे गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. आता न्यायालयाने आरोप निश्चित केल्याने या बहुचर्चित प्रकरणाच्या सुनावणीला वेग येणार असून पुढील सुनावणी २३ फेब्रुवारीपासून सूरू होणार आहे.

# येत्या सोमवारी जेजुरीत सोमवती यात्रा नाही

जेजुरी । प्रतिनिधी

येत्या सोमवारी (दि.१६) अमावस्येच्या प्रारंभ सायंकाळी ५ वाजून ३३ मिनिटांनी सुरू होत असून मंगळवारी समाप्त होत आहे. सोमवती अमावस्या ही सूर्योदय काळात येत नसल्याने सोमवती उत्सव नसल्याने खंडोबा देवाचा पालखी सोहळा क-हा स्नानासाठी निघणार नसल्याचे मुख्य मानकरी इनामदार राजाभाऊ पेशवे तसेच श्री खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ खांदेकरी मानकरी मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी सांगितले आहे.



रविवारी (दि.१५) महाशिवरात्री उत्सव सुरू होत आहे . या काळात मुख्य मंदिरामध्ये त्रैलोकीच्या शिवलिंग दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होणार आहे. वर्षातून एकदाच ही शिवलिंगे धार्मिक विधी व दर्शनासाठी खुली होत असल्याने पोलीस प्रशासन ,नगरपालिका , विश्वस्त मंडळ ,ग्रामस्थ ,पुजारी ,सेवेकरी मंडळाने बैठक घेत उत्सवाचे नियोजन केले आहे .

सोमवारी सायंकाळी अमावस्येला प्रारंभ होत आहे . सोमवारी अमावस्या काळात सूर्योदय आला तरच हा सोमवती उत्सव गृहीत धरला जातो व खंडोबा - म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्तीसह पालखी सोहळा क-हा नदीतीरावरील पापनाश तीर्थाकडे स्नानासाठी मार्गस्थ होत असतो. मात्र यावेळी अमावस्येचा सूर्योदय मंगळवारी (दि.१७ ) होत असल्याने पालखी सोहळा क-हा स्नानासाठी निघणार नसल्याचे मुख्य मानकरी पेशवे ,ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोंमणे यांनी सांगितले आहे.

भेसळयुक्त भंडारा विकणाऱ्यांवर कारवाई करणार

२१ डिसेंबर रोजी भंडाऱ्याचा भडका होऊन १६ जण होरपळले होते तसेच भेसळयुक्त भंडारा विक्रीबाबत व त्यामधून होणाऱ्या दुष्परिणामाबाबत वारंवार भाविक व ग्रामस्थ तक्रार करीत असूनही काही विक्रेते रसायन मिश्रित भेसळीचा भंडारा विकत आहेत. पुढील काळात जत्रा यात्रा उत्सवांचा हंगाम असून भेसळीच भंडारा विक्रेत्याच्या विरोधात कठोर व ठोस कायदेशीर उपाययोजना राबविणार असल्याचे जालिंदर खोमणे यांनी सांगितले